म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. ७८०

# अश्रू

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८/१२/८८



REFBK-0006781

सी. द. आपटे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# फुलांचे अश्रू

[ काव्य-संग्रह ]

कवि—सी. म. बापट

ग्रंथ संग्रहालय, ठाणे
क्र. ६६२१ ६८८१
REFBK 0006781
REFBK-0006781

प्रस्तावना

'गिरीश'

सोल एजंट्स
जी. जोशी अँन्ड ब्रदर्स
बुकसेलर्स,
झावबाची वाडी
चाळ नं. २०
ठाकुरद्वार, मुंबई नं. २

किंमत दोन रुपये.

प्रकाशक :
**ह. ने. काटवे**
शहापूर ( सं. सांगली )

( या पुस्तकासंबंधीं व यांतील कवितासंबंधीं
सर्वप्रकारचे हक्क लेखकाधीन आहेत )

प्र थ मा वृ त्ति
डिसेंबर १९४६.

मुद्रक :
व्यं. य. शहापूरकर
मनोहर प्रिंटिंग प्रेस, बेळगांव.

# प्रकाशकाचें निवेदन

मी कवि नाहीं व रसिकही नाहीं, परंतु काव्यवाचनाचा मला थोडा नाद आहे. चार वर्षांपूर्वीं एक प्रसंग घडला तो असा— माझ्या एका मित्राच्या घरीं मी तेथील रेडिओजवळ बसलों असतां श्री. बापट नांवाच्या एका कवीचें भावगीत सुरू झालें. तें गीत हृद्य असल्यानें त्याकडे माझें लक्ष वेधलें. सहज चौकशी करतां कवि बापट हे येथीलच शहापूरच्या चिंतामणराव हायस्कूलमध्यें शिक्षक असल्याचें ऐकून मला थोडें आश्चर्य वाटलें. त्यानंतर मी श्री. बापट यांची गांठ घेतली व त्यांच्या कवितेची वही घरीं आणून वाचून पाहिल्यावर मला बरेंच समाधान वाटलें. त्याचबरोबर त्यांचें काव्य अद्याप अप्रकाशित कसें राहिलें, याचेंहि मला नवल वाटलें.

केवळ योगायोगानेंच कवि बापट यांचे '**फुलांचे अश्रू**' हें काव्य-पुस्तक प्रसिद्ध करण्याचें आतां जमून आलें. या काव्यसंग्रहाला कोणातरी प्रथितयश साहित्यिकाची प्रस्तावना हवी होती, परंतु महाराष्ट्रांतील कोणाहि नामवंत कवि, लेखक वा टीकाकार यांच्याशीं माझी ओळख नसल्यानें मी मनांत चिंतातुर झालों होतों. सुदैवानें कविवर्य **गिरीश** यांनीं या कवितासंग्रहाला रसग्रहणात्मक प्रस्तावना लिहून श्री. बापट यांना व एकप्रकारें मलाहि उपकृत केलें आहे. सांगलीचे राजकवि **साधुदास** यांनींहि या कवितेला शुभ आशीर्वाद दिला आहे. या दोघां कविवरांचे हार्दिक आभार मानणें माझें आद्य कर्तव्य आहे.

या पुस्तकाच्या रूपानें श्री. सी. म. बापट यांचे हे '**फुलांचे अश्रू**' प्रेमळ वाचकांच्या ओंजळींत मी घालीत आहे.

मुद्रक श्री. व्यंकटराव शहापूरकर यांनीं हें पुस्तक आपल्या 'मनोहर' छापखान्यांत सुबकरीतीनें छापून दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

शहापूर ( बेळगांव )
८।१२।१९४६

वाचकांचा नम्र,
**ह. ने. कारवे**

६८७९

# अश्रूंची सृष्टी

**'फुलांचे अश्रू'** म्हटलें कीं, आपणांस **रस्किन**च्या 'समाधि' गुणाची ( Pathetic Fallacy ) स्मृति अपरिहार्यपणें होते. फुलांवर किंवा निर्जीव म्हटल्या जाणाऱ्या वस्तूंवर मानवी मनोधर्माचा आरोप करून, त्याकडे पहाण्याची दृष्टीच यांत असते. 'एका वस्तूच्या गुणांचें दुसऱ्या वस्तूवर चांगलें (सम्यक्) आधान असल्यानें' त्यास 'समाधि' असें यथार्थतेनें म्हणतां येतें. या काव्यात्म दृष्टीच्या मागें मानवी जीवनांतील विविध भावना दडलेल्या असतात. ज्या गोष्टी मनुष्य उघडपणें लिहूं शकत नाहीं किंवा ज्या भावनांमुळें त्याला जड सृष्टीदेखील आपल्यासारखी सुखी वा दु:खी झाली आहे असें वाटतें, त्यांचें चित्रण प्राय: समाधिगुणाच्या साहाय्यानें केलेलें आढळतें. जड सृष्टीला या ठिकाणीं तो आत्मवत् मानतोच; पण तिच्याशीं एकरूप होणाऱ्या समभावनेनें तो आत्माविष्करणहि करीत असतो. हें आत्माविष्करण वस्तूंतील सौंदर्याच्या चित्रणानें होत असतें व म्हणूनच त्याला काव्यांत एक विशेष स्थान आहे. श्री. बापट यांच्या मनोधर्मांत फुलांचे मनोधर्म सांठविले असल्यामुळें व त्यांचें मानसशास्त्र कांहींसें वरीलसारखें असल्यानें त्यांनीं आपल्या काव्यफुलांना **'फुलांचे अश्रू'** असें नांव दिलें असल्यास त्यांत नवल नाहीं.

फुलांवर आपणास जे अश्रू वा थेंब दिसतात ते त्याठिकाणीं दोन कारणांनीं आलेले असतात. एक पावसाचा वर्षाव होऊन किंवा आकाशांतून दंव पडून. यांतील सुखवृष्टी कोणती व दु:खवृष्टी कोणती हें सांगणें कठीण असलें तरी हीं सुखदु:खें त्यांच्यावर आकाशासारख्या विशाल, अज्ञात व स्वर्गीय भागांतून आलेलीं असतात व त्यांनीं त्यांचें जीवन बनविलेलें असतें. हें जीवन चैतन्यदायी व सौंदर्यपूर्ण असतें. फुलांना त्याची जाणीव असते कीं नाहीं कुणास ठाऊक! पण या स्वर्गीय वृष्टीमुळें त्यांच्या जीवनसौंदर्यांत निःसंशय भर पडलेली असतें. हाच दृष्टांत पुढें नेऊन मानवी मनाला किंवा जीवनाला लावला म्हणजे अज्ञात सुखदु:खांनीं त्याचें जीवन कसें व्याप्त होतें व त्यांतच सौंदर्यसंपन्नता कशी निर्माण होते याची कल्पना येईल. फुलाला हें सौंदर्य दिसलें नाहीं, तरी मानवी प्राण्यांत कवीला हें दिसतें व तो तें पकडून त्याचें चित्रण आपल्या कलाकुशल कुंचलीनें करतो. श्री. बापट यांचे '**फुलांचे अश्रू**' असेच जन्म पावले आहेत.

मनुष्याला आपलीं सुखदु:खें बोलून दाखवावीशीं वाटतात; आंतले आंत दबलेले उमाळे व गुदमरलेले उसासे बाहेर टाकावे, कुणापाशीं तरी बोलून मन मोकळें करून घ्यावें असें त्याला वाटतें. याला अनुसरूनच श्री. बापट यांना आपलीं व दुसऱ्याचीं जीं सुखदु:खें दिसलीं व ज्यांबद्दल त्यांच्या मनांत तळमळ झाली, तीं त्यांनीं आपल्या रसाळ वाणीनें रसिकांजवळ बोलून दाखविलीं आहेत. रसिकाशीं हितगूज करतांना आपल्या कवितेचें 'पिकलें फळ' ते त्याच्यापुढें ठेवतात व म्हणतात, "ये पांखरा, ये; हें पिकलें फळ चाख; तुला शीण आला आहे हें मी जाणतों; माझ्यांतील सगळी गोडी या फळाच्या रूपानें आकारून आली आहे आणि तुझ्याबद्दलची माझी माया वेडी आहे; हा नवरंगाचा आणलेला नजराणा तूं घे आणि याचा गोड शेवट कर." यावरून आपलीं पक्व फळें इतरांनीं चाखावीं म्हणजे आपलें मन शांत होईल, ही त्यांची भूमिका किती स्वागतशील व परसुखानें सुखावणारी आहे हें कळेल.

श्री. बापट यांचें आतांपर्यंतचें ऐहिक जीवन अत्यंत कष्टाचें, त्रासाचें व खडतर कसोटीचें गेलें आहे. जीवनांत इच्छित वा ध्येयभूत गोष्टींचा त्यांना लाभ झाला नाहीं. दुर्दैवानें त्यांची निष्ठुरपणानें पारध केली आहे. जीवनांत ही अडवणूक कां होते किंवा 'एकाद्याचें नशीब' असें कां असतें, हें न सांगतां येणें, हें त्यांतील आणखी मोठें दु:ख आहे. फोडावर आलेली ती पुटकळीच! यामुळें त्यांच्या जीवनावर निराशेचें दाट सावट पडलें आहे. त्यांच्या आत्मपर कवितांत यांचें प्रतिबिंब स्पष्ट उमटलें आहे. त्यांच्या या जीवनांत व्यक्तीला भोगावीं लागलेलीं सुखदु:खें व ध्येयभूत प्रीतीच्या अप्राप्ती-मुळें निर्माण झालेली मनोवेदना यांचें चित्रण आहे. विशेषत: भग्नप्रीति या विषयावरील गीतांनीं या पुस्तकाचा निम्मा भाग व्यापला आहे.

भग्नप्रीतीचें चित्रण करतांना त्यांनीं स्त्री व पुरुष या दोन्हीहि भूमिकां-वरून तें केलेलें आहे. स्त्रीच्या भूमिकेवरून केलेल्या चित्रणांत 'प्रीतीची उंची, झऱ्यावरील भेट, घरधन्याचा विरह, चांदण्यांतील भेट, जिवलगाची अकरुणा, मुशाफिर, प्रीतीचें कंटकमय जीवन, प्रीतीचा चित्तचोर जादुगार, तरुणीचा बुडलेला घट किंवा अभागिनीचें जिवंत मरण' हे विषय आले आहेत. त्यांत 'नव्या नवलानं फुलून आलेलीं रानं आहेत, घराला जावयास उशीर झालेल्या राणीला पुन:पुन्हा वळून परत बोलविणारा सजण आहे, दूर गेलेल्या घरधन्याला परत आल्यावर डोळाभर पहाण्यासाठीं आतुरलेली माया आहे, सजणावांचून जग भयाण वाटणारी प्रीति आहे, एक रात्र सांगाती घालविल्यास मुशाफिरास प्रीतीचं पाथेय देणारी उत्कंठिता आहे, निष्पाप जिवांची निर्मळ कहाणी आहे, मनाला मोहवून जाणाऱ्या पांखराला केलेली कळकळीची विनवणी आहे किंवा प्रियकराला एकदां शेवटचे डोळे भरून पाहणारी करुणाहि आहे.' श्री. बापट यांनीं चितारलेल्या या चित्रांत स्त्री-स्वभावाची विविधता आली असून त्यांतील सूक्ष्म छटा त्यांनीं मोठ्या कुशलतेने रंगविल्या आहेत. प्रसंगाची उत्तम निवड, स्वभावांतील रेखीव सूक्ष्मता व तिला शोभणारी सजावट, यामुळें त्यांची स्त्रीहृदयांतील प्रीतीचीं चित्रें सरस

बेठलीं आहेत. आपलें चित्र रंगवितांना ते त्याची पार्श्वभूमि निसर्गानें सजलेली दाखवितात. हा निसर्ग काव्यगत भावनेशीं संवादी असतो व त्याचा रस-परिपोषास भरपूर उपयोग होतांना दिसतो. त्याचप्रमाणें कोमल भाषा हें तर त्यांचें वैशिष्टयच आहे. त्यामुळें अंतरंगांतील भावना सूक्ष्म कोमलतेनें रंगवितांना तिची फार मदत होते. वाटसराला उद्देशून लिहिलेलें हें गीत पहा. ती म्हणते—

"थांब जरा वाटसरा!

सुके कळी क्षितिजाची दिन जातां दूर घरा."

यांत संध्याकाळची मावळती छाया अभिप्रेत भावनेशीं किती संवादी आहे तें दिसेल! त्या स्त्रीच्या हृदयांत हुरहूर उत्पन्न झालेली आहे व वाटसरानें थांबावें ही तिची इच्छा आहे. ही हुरहूर रंगवितांना श्री. बापटांनीं योजलेल्या कल्पना व त्या व्यक्त करण्यासाठीं घातलेली भाषा यांतील कोमलता, वजन, तोल व ताल अंतर्मनाला कसा डुलविणारा आहे, तो पहा—

"मधुर सूर ओसरला,

बावरली तरुबाला,

महिवरला रंग विरे गहिंवरला रानझरा."

यानंतर–'तुझी पायवाट काजळली आहे, जीवनकला झांकळली आहे, नभानें बुरखा घेतला आहे व तें सुरुकारा सोडीत आहे' असा तिनें इशारा दिला आहे; इतकेंच नव्हे तर 'पुढील भीतिप्रद प्रवासांतील धोकाहि ती आत्मीयतेनें सांगून ठेवीत आहे.' ती म्हणते—

"छायांकित शांति वसे,

दीप निशेचा न दिसे,

चपल वीज चमचमते रिमझिमतां जलधारा."

अशा स्थितींत 'तूं इथं रहा, तुला मी पाथेय देतें, एक रात्र सांगाती घालव व सकाळीं अरुणोदय होतांच दिशा तुझा पथ उजळतील, मग जा;' अशी काकुळतीची विनवणी ती करतांना दिसते व इथेंच सर्व चित्रण कलात्मक-रीतीनें संपतें. यांत मूळ विषयाला दिलेली निसर्गाची पार्श्वभूमि, किंवा त्या स्त्रीच्या हृदयांतील उत्कंठा व तिला अनुसरून घातलेल्या कल्पना यांचें संवादित्व वाचकांच्या मनांत हुरहूर उत्पन्न करितें. याखेरीज छंददृष्ट्या 'दासी' या जातीचें वजन व नांवांतील अन्वर्थकता हीं अत्यंत अनुरूप अशीं आहेत. श्री. बापट यांची शब्दांची कुसर तर फारच मोहक असते. 'ओसरला, महिरला, गहिंवरला, काजळला, झाकळली, रिमझिमती' या शब्दांतील नादमाधुर्य व नर्तनगर्भ डौल अत्यंत आकर्षक आहे. वाटसराला विनवणी करण्याची कल्पना जुन्या संकेतांतून घेतली आहे एवढाच त्यांत जुनेपणा आहे; एरवीं त्यांतील रसभावांचें चित्रण आमूलाग्र सुंदर साधलें आहे. या वानगीवरून बाकीचीं प्रेमगीतें कशीं असतील त्याची वाचकांना कल्पना येईल. आधुनिक मराठी कवितेंत पुरुषांनीं रंगविलेल्या स्त्रीभावनांचीं चित्रें थोडीं आहेत; त्या दृष्टीनें श्री. बापट यांची ही कामगिरी विशेष उल्लेखनीय आहे.

पुरुषाच्या भूमिकेवरून लिहिलेलीं प्रेमगीतें इतकींच सरस असून तो श्री. बापटांच्या जीवनांतील एक विशेष जिव्हाळ्यानें रंगविलेला भाग आहे. यांत 'निशाण सांवरून धरण्याचें पौरुष आहे, जगायचें तर जोडीनें जगूं व मरायचें तर जोडीनें मरूं' अशीं प्रतिज्ञेची भाषा आहे, लपलेल्या सजणीला बोलविणारा काव्यात्म सजण आहे, जीवनांत मोहिनी आल्यावर तिच्याशीं

बोलण्यासाठीं फुरफुरलेल्या ओठांतच राहिलेली अमृतबोली आहे, जीवनाच्या कोलाहलांत प्रीतीला अंतरलेला थारा आहे, यक्षाचें मेघगीत आहे, दाराला रेलून उभी राहून मिटलेल्या नयनांनीं मीलन पहाणारीच्या कानांत कोणी तरी गीत गुणगुणणारा आहे, जीवनाच्या प्रवासांत फुलांचे कांटे झालेला मुशाफिर आहे, काळेभोर डोळे, स्निग्ध केशपाश व सावळा वर्ण यांची मोहिनी पडलेला विरही आहे, एकदा मिळून कायमचे निराळे झालेले दोन ओघ दर्शविणारा विहंगाचा करुणसुंदर सूर आहे किंवा करपलेल्या फुलबागेंतहि फुललेलें शेवटचें फूल प्रियेला देणारा प्रेमिक आहे.'

या प्रेमिकांच्या भावना पुरुषवृत्तीला शोभतील अशा कोमल पण विचारगर्भ, व व्याकुळ करणाऱ्या पण संयमशील आहेत. मधूनच एकदम एकाद्या मनोहर दृश्यानें त्यांचा उद्रेक होतो, पण तेंहि पुरुषाच्या मानस-शास्त्राला शोभणारें आहे. 'जाऊं परतीरा' या गीतांत याची चांगली प्रतीति येते. अंधारांत प्रकाश-किरण दिसला कीं प्रवाशाला आनंद होतो व त्याचे भाव एकदम उचंबळून येतात. तीच स्थिति जीवनाचा प्रवास करणाऱ्या प्रेमिकाची झाली आहे. तो म्हणतो—

"सरसावे सुंदर हा तिमिरांतुनि तारा,
ये सखये! एकपणें जाऊं परतीरा."

आणि मग त्याला 'भोंवती अथांग जल दिसतें, शांतीचा अनुभव येतो, हृदयांत मात्र आतुरता असते; रजनीला पडलेलीं स्वप्नें निळ्या नभांत दिसतात आणि त्याच्या डोळ्याला मात्र अश्रू येतात; आणि म्हणून तो तिला हा नवसाचा क्षण साधण्याची' विनंति करतो. जवळपास देखील त्याला अनुकूल अशींच दृश्यें दिसतात.

"भावगीत वनबाला गाते सुमनांचें,
रंगवितां श्यामवना चंद्रकला नाचे;
गुलगुलती तरुलतिका शांत किनारीं या,
चाळविती हिरवळिला ओझरत्या छाया."

आणि म्हणून तो तिला पदर करून येण्यास सांगतो. होडी भुरभुरतांना त्याला जललहरी थरथरतात हें दिसतें, मनांत पहिली गोडी पालवल्यावर त्याचें मन थयथय नाचूं लागतें, या मंद चांदण्यांत आपली जोडी खुलेल म्हणून तो तिला सर्व भय सोडण्यास सांगतो व वारा कानांत गुणगुणून आपला शीण कसा हरतो त्याची आठवण देतो. पण त्याचा जीवनाच्या कोलाहलांतला प्रीतिविषयक अनुभव फार कटु आहे; म्हणून तो म्हणतो—

"कोलाहलिं अंतरला प्रीतीला थारा,
विटलें हें जीवन त्या स्वार्थी परिवारा."

आणि मग त्याचा बंडखोरपणा जागृत होतो व 'आपणांस सुप्रभात दाखविणार असलेल्या नव्या वाटेचा पुकारा करून, जगाचा सर्व रागलोभ आपण आपल्या अन्योन्य सहवासांत विसरूं,' असा तिला विश्वास देतो; आणि शेवटीं

"रानपाखरा न रुचे पंजरिंचा चारा"

हें खुणेचें कटु सत्य बोलून तिला आपणांस येऊन मिळण्याचें बोलावणें करतो. श्री. बापट यांचें प्रेम दुबळें नाहीं; तें सकस, सोशिक व स्वातंत्र्यवादी आहे व म्हणूनच काव्यात्म आहे. पुरुषहृदयांत उद्भवणाऱ्या प्रेमाची शक्ति, त्याची व्याकुळता व त्याचा जिवटपणा कसा असतो हें त्यांच्या त्या त्या कवितांतूनच वाचकांनीं पहावयास हवें.

प्रेम ही त्यांच्या जीवनाची मुख्य भावना आहे; तो त्यांचा स्थायीभाव आहे; व या बाबतींत त्यांचे 'प्रेमिक' व त्यांनीं निर्माण केलेल्या 'प्रिया' विविधस्वरूपी आहेत. त्यांच्या सर्वांचें प्रेमसूत्र एकच आहे, त्याची दृष्टी एकच आहे, फक्त त्यांचे स्वभाव व ते रेखाटण्यासाठीं घेतलेले प्रसंग विविध आहेत. हें 'एकच प्रेमसूत्र' म्हणजेच श्री. बापट यांच्या प्रेमाचें तत्वज्ञान आहे. वाचकांनीं त्याचा प्रत्यय या काव्यसंग्रहांत आलेल्या चोवीस प्रेम-गीतांतून घ्यावा.

सुंदर प्रेमगीताखेरीज श्री. बापट यांच्या प्रतिभेला आणखी कांहीं सुबक पैलू आहेत. आपल्या गांवाच्या आसपास असणाऱ्या 'साखरओढा, जल-वाहिनी' यासारख्या गोष्टींनीं वा भंगलेल्या देवळांतील मूर्तिज्योतींनीं त्यांचें मन आकर्षित होतें; शाळा, भिकारी, मुकी कळी किंवा वनस्थली यासारख्या गोष्टींचें अंतरंग ते हळुवार हातानें व आत्मीयतेनें उकलून दाखवितात; मातृप्रेमाचें चित्र ते वस्तुनिष्ठ भूमिकेवरून रंगवितात; व वाल्मिकीसारख्या आदिकवीच्या काव्याचा पहिला उद्रेक किती सहजस्फूर्त होता याची गोडी ते रसज्ञतेनें वर्णून सांगतात. या सर्व काव्यांतील त्यांची वस्तुनिष्ठ भूमिका रससिद्ध कवीची आहे.

परंतु मृदु प्रेमगीतें किंवा नाजुक वस्तुगीतें लिहिणारे श्री. बापट हे आजकालच्या 'निर्भेळ स्वातंत्र्य, भीषण क्रांती वा अहिंसामय शांती' यांच्या वातावरणापासून दूर नाहींत. तरुणापासून वृद्धापर्यंत सर्वांना वेध लावणारें स्वातंत्र्यविषय त्यांच्याहि मनाची पकड घेतात व इथेंच श्री. बापट यांच्या शृंगाराला वीर, भयानक वा रौद्र या रसांचीं पार्श्वभूमि कशी आहे हें कळतें. त्यांच्या 'नव्या जगांत,' 'पराजितांचें गीत,' 'ज्वाला,' 'करूं कसें स्वागत,' 'पूजा,' 'तळमळणारें मन,' 'कोडें' व 'घे आतां अवतार' या कविता नव्या युगाचें व येणाऱ्या स्वातंत्र्याचें तत्वज्ञान प्रतिपादतात. त्यांत त्यांना नव्या जगांत जाण्याची हौस असलेली दिसते, घायाळांच्या आशा अंधारांतुन स्फुरतांना दिसतात, शृंखला पायांत खळखळूं लागल्यावर गुलाम कसा

किंचाळतो तें ऐकूं येतें, गुलामी जिणें आंतून कसें जळतें तें दिसतें. प्रीति ही शांतिप्रिय असूनहि ती क्रांतीची पुजारीण निर्भय कशी असते तें आढळतें, नव्या पिढीच्या बलिदानाचा अर्थ उमगतो, व शेवटीं संभ्रम उत्पन्न झाल्यावर ते देवाला—

“घे आतां अवतार, देवा !

आळवुनी तुज शिणली वाणी, अंत किती बघणार ?”

असें कळवळून विनवितात. ‘तुझ्यावांचून आम्हांस दुसरा आधार नाहीं, तूं आपली ‘मुरली गीता’ घुमव व आम्हांला संजीवन दे, परवशतेचा पाश निवारून शांतिसुखानें जीवन फुलव व सर्व विश्व एकमुखानें मानवतेचा “जयजयकार” करील असें कर’ ही त्यांची त्यांतील शेवटची आळवणी आहे. या आळवणीची बैठक अत्यंत सहृदयतेची, व्यापकपणाची व मानव्याची आहे व यांतच श्री. बापट यांच्या थोर अंत:करणाची व जीवनविषयक खोल तत्वज्ञानाची साक्ष आहे.

श्री. बापट यांच्या लिखाणांत गुणांबरोबर कांहीं दोषहि उतरले आहेत. त्यांची भाषा गोड व मृदु आहे; पण याच गुणांचा अतिरेक झाल्यामुळें तिच्यामध्यें कांहीं प्रसंगीं जो रानवटपणा यावयास हवा किंवा जो कणखरपणा पाहिजे तो आलेला नाहीं. जगांत सारेच भाव ‘हळुवार, मृदुमृदुल किंवा ललित-कोमल’ नाहींत. असे भाव व्यक्त करतांना भाषेनें आपलें खरें सामर्थ्य दाखविलें पाहिजे; तें प्रसंगीं आलेलें दिसत नाहीं. त्यामुळें त्यांचें कोमलभावांचें चित्रण जसें मोहक वाटतें तसें वीर किंवा रौद्र भावांचें वाटत नाहीं.

दुसरा दोष म्हणजे त्यांच्या कवितेंत कांहीं ठिकाणीं रचना भाववाचक नामात्मक झाली आहे. योग्य प्रमाणांत हीच रचना भूषण म्हणून शोभेल, पण तिचा अतिरेक झाल्यास अर्थसंभ्रम निर्माण होतो. ‘करुणा कण्हते,

शांति फुलांचे अश्रू वेंचते, मानवता विभवा चढेल, लटके मान कलेची' अशा प्रयोगांच्या पुनरुक्तींनीं कवितेंत अमूर्तता उत्पन्न होते.

तिसरा एक दोष म्हणजे प्रत्येक भावना आकाराला आणतांना तिला निसर्गसौंदर्याची पार्श्वभूमि देण्याची त्यांची अतीव हौस, हा होय. सर्वच भावनांना निसर्गाची पार्श्वभूमि लागते असें नाहीं. त्यासाठीं योग्यायोग्य स्थळें हुडकून तशी योजना करणें आवश्यक असते, व त्यांतच कलेची खरी रंगत आहे.

पण हे किरकोळ दोष सोडले, तर आधुनिक कवींत त्यांच्या काव्याला पुष्कळच वरचें स्थान मिळण्यासारखें आहे. त्यांचे शब्द, समास, वाक्यें आणि रचना घोटीव व संगमरवरी दगडासारखी आरस्पानी असते. कविवर्य तांबे यांचें क्वचित् अनुकरण दिसलें, तरी त्यांत त्यांचें स्वत्वहि आहे. वर्णनशैली, कल्पना व उत्प्रेक्षा ( संभावना ) याबाबतींत त्यांची प्रतिभा उच्च दर्जाची आहे. 'सोनघरें, कोमावला, वसंतवेडा, आभाळ भारावलें, गोडी आकारुनि ये, विरघळली गार सावली, गहिंवरला रानझरा, अमृतधारा रिमझिमते, जीवन झुळझुळतें,' यासारखे कांहीं गोड शब्दांचे संप्रदाय त्यांनीं आपले म्हणून निर्माण केले आहेत; ते निःसंशय लोकप्रिय होतील. त्यांच्या भाषेंतील संगीत, कल्पनेंतील नाजुकपणा व रचनेंतील सुबकपणा यांनीं त्यांची कविता उत्तम सजली आहे. कवि या दृष्टीनें त्यांनीं अनेक गुण आत्मसात् केले आहेत. या गुणांतील सर्व सौंदर्य येथें उकलून दाखविणें शक्य नाहीं, म्हणून या अश्रूंत दिसणारी सृष्टी कोणत्या जातीची आहे तिचें नुसतें दिग्दर्शन केलें. बाकीचा भाग रसिकांनीं स्वतांच पहावयाचा आहे. त्यांतूनच श्री. बापट यांना स्फूर्ति मिळणार आहे व त्यांतूनच त्यांच्या उद्यांच्या '**फुलांचें हास्य**' उमलणार आहे.

६ डिसेंबर १९४६
विश्रामबाग, सांगली.

**गिरीश**

# आशीर्वाद

श्री. सी. म. बापट यांचा व माझा परिचय बऱ्याच दिवसांचा आहे. त्यांच्या कवितेविषयीं मला पूर्वीपासून आपुलकी वाटत होती. तीन वर्षांपूर्वी व्याख्यानानिमित्त मी शहापूर-बेळगांवास गेलों असतां त्यांच्या काव्यगुणाची मला खरी कल्पना आली. त्यांनीं बरीच स्फुट कविता लिहिली आहे. रुबायांच्या धर्तीवर रचलेली स्वतंत्र सुटी कविता त्यांनीं त्यावेळीं मला दाखविली. त्यांच्या काव्यानें मला समाधान वाटलें. त्यांची ही काव्यरचना अद्यापि पुरी झाली नाहीं. तथापि ईशकृपेनें तो भाग त्यांच्या हातून पूर्ण झाल्यास मराठीकाव्यांत एक नवी भर पडेल.

'**फुलांचे अश्रू**' हा त्यांचा कवितासंग्रह प्रकाशित होत आहे हें पाहून मला आनंद वाटला. सदर काव्यसंग्रह मी वाचून पाहिला व मला तो फार आवडला. साधी सुबोध शब्दरचना, सोप्या व योग्य चाली, गोड कल्पना आणि मनाचा हळुवारपणा असा तिहेरी संच जमल्यामुळें कविता आल्हाददायक उतरल्या आहेत. त्यांची कविता लोकप्रिय होईल यांत शंका नाहींच, पण उत्तरोत्तर तिची निर्मिति अधिक व्हावी अशी माझी इच्छा आहे.

कवि श्री. बापट यांच्या मुग्ध कवितावधूला मी या प्रसंगीं आपलेपणाच्या भावनेनें शुभ आशीर्वाद देत आहे.

**सांगली**
२।१२।१९४६.

राजकवि
**साधुदास**

# फुलांचे अश्रू

सी. म. बापट

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| फुलांचे अश्रू | १ |
| पहिलें काव्य | २ |
| चल पुढें ! | ४ |
| माझें गांव | ५ |
| सकाळचं ऊन | ६ |
| वादळ | ७ |
| शाळेंतून जगांत | ८ |
| कशाला बोलविसी ? | १० |
| खेड्यांतील जीवन | ११ |
| घरधनी रानीं गेला | १२ |
| त्या दिवशीं | १३ |
| माझें घर | १४ |
| भरारी | १६ |
| हेंच कां प्रेम ! | १८ |
| माझी शाळा | २० |
| मोहक तारा | २२ |
| सागर | २३ |
| जाऊं परतीरा ! | २४ |
| थांब जरा | २६ |
| निरोप | २७ |
| कोण ती गुणगुणते ! | २८ |
| त्या बाजूला | ३० |
| वाटेवरचा दिवा | ३२ |
| मुशाफिर | ३३ |
| मूर्ति आणि ज्योति | ३४ |
| शाप | ३६ |
| नव्या जगांत | ३८ |
| कोणीकडे ? | ४० |
| शांतीचा प्रतिध्वनि | ४१ |
| सावळी | ४२ |
| जलवाहिनी | ४४ |
| फुलांचें गाणें | ४६ |
| भिकाऱ्याचे बोल | ४८ |
| साखरओढा | ४९ |
| पहाट | ५२ |
| अभागी आओी | ५४ |
| अखेरची अिच्छा | ५६ |
| घ्या काढुनि माझा घट | ५८ |
| पराजितांचें गीत | ५९ |
| ज्वाला | ६२ |
| पिकलें फळ | ६४ |
| जिवंत मरण | ६५ |
| सागरांतील बेटें | ६६ |
| मुकी कळी | ६८ |
| करूं कसें स्वागत ? | ७० |
| वनस्थली | ७२ |
| पूजा | ७३ |
| तळमळणारें मन | ७६ |
| कोडें | ७८ |
| काव्यगंगा | ८० |
| शेवटचें फूल | ८२ |
| घे आतां अवतार ! | ८३ |

# समर्पण

( अ[illegible]–मंजरी )

किति फुलें अंतरीं बाहेरीं विखुरलीं
तीं घेत वेंचुनी आंच जिवा लागली
अेकेक जुळवितां मधुभावाचा दुवा
वाढविते करुणा कवनांतिल गोडवा

चाऱ्याविण चोंची चिंवचिंवती कितितरी
रंगला विलासीं अहंकार आसुरी
जगिं पडे गरीबां जगण्याची वानवा
पढवीत मानवा काळ धडा कीं नवा

क्रांतिचे दिगंतीं दुमदुमती दुंदुभी
धडधडत्या हृदयें मानवता ही अुभी
भिजविती भूमिला रुधिराश्रूंचे झरे
अैकवी कथा ती प्रीती करुणस्वरें

तोडीत पाश सावेश पुढें धांवतां
घनतमीं जागती ज्योती दावी पथा
मरणांतुनि जातां ये नवता जीवना
फुलविते पुन्हा हळु आशा सुकल्या मना

गहिंवरुनी बघते विश्वाची माअुली
ही अश्रुफुलांची माळ तिला वाहिली

# फुलांचे अश्रू

[ जाति–कोकिळा ]

दा. क्र. ६७८९

दाटला अंधार,
दिसेना आशेचा आधार

परदेशी हा फिरे मुशाफिर, बंद सुखाचें दार
समोंती वारा वाहे गार
ढळतां तारा मध्यरात्रिचा
मंद घुमे हुंकार
गाभाऱ्यांतुनि शांतीच्या झणिं अेकच ये झंकार

वाटे गावें माझ्या जीवा
गोड तुझ्यापरि गीत
फोल होत ही वाणी देवा ! झुरते वेडी प्रीत
जाय कुठें ती जीवनज्योती
राहे अपुरा हार
कोण तुझ्याविण मूक फुलांचे अश्रू हे पुसणार !

हिरवाळीच्या फुलवित जीवा प्रेमळ ती तमसा
शांत आश्रमा हासत घाली गोड कसा वळसा
रंगपटीं क्षितिजाच्या झळके अुषा भानहारी
मधुमासांतिल मंदानिल घे मंगल ललकारी १

रुणझुणतां सोनेरी स्वप्नें सृष्टिसखी नटली
स्वर्ग मनोहर विहरे भूवर दृष्टि तशी दिपली
नाचे चंचल छाया मंजुळ किलबिल ये कानीं
सुरम्य अरुणोदयीं वाल्मिकी रमे अर्घ्यदानीं २

सुरेख तीरा सुरंग लाभे सुवर्णलहरींचा
विरक्तासही विलास मोही मुग्ध वनश्रीचा
मोहरल्या शाखेवर सुंदर क्रौंचयुग्म रमलें
जवळच अेका चारुलतेची खुलतीं दोन फुलें ३

मधुर कूजनीं भरी मोहिनी मोहक प्रेमकला
जीवनवीणा छेडित आशा आळवीत सकला

ऐकत कुजबुज तरुलतिकांची    परते यतिराया
चाले निर्मल विहंगलीला    भूल पडे हृदया ४

क्षणीं दिव्य त्या सुटला    दारुण बाण निषादाचा
कळवळली वनबाला,    खचला प्राणच प्रणयाचा
पटकन् खालीं पडतां तो नर तडफडते मादी
आर्तनाद ते घुमवी करुणा,    स्फुंदत रान नदी ५

तळमळला मनिं मुनिवर    नयनीं पाझरतां पाणी
निघे मुखांतुनि शापरूप झणिं    छंदोमय वाणी
मूक जिवांच्या रुधिराश्रूंनीं    सुप्रभात न्हाली
गात कहाणी फुले जगीं ही    काव्यकळी पहिली ६

---

## चल पुढें !

[ जाति-सखी ]

चल पुढें अतां तूं
झरझर पाउल उचल गडे !

ओढ जिवा लागे सजणी
चाहुल घे हळु हास क्षणीं
साद पुकारित पुढतीं जातां
मधुर मना तें स्वप्न पडे

बिकटच भासे वाट यशाची
चढाओढ ही जगण्याची
सोबत देतां सुंदर आशा
प्रकाश पसरे चोहिंकडे

निशाण धरुनी आवडीनें
वाव झेलूं जोडिनें
शिखर उंच हें धीरें चढतां
चौघडा प्रीतिचा उरीं झडे

## माझें गांव

[ जाति–गोविंद ]

मोहक माझें गांव, किती तें
सुखवाडी हें त्याचें नांव

सुंदर कोंदण वनराजीचें
गीत घुमे त्यामधें नदीचें
नाजुक नाचे नाव

स्वैर पाखरापरी फिरावें
सोन्याचे कण वेंचुन घ्यावे
आणिक नाहीं हांव

हसतीं सुमनें सांजसकाळीं
बाळपणाची मौज निराळी
बहरे भोळा भाव

मिळे सौंगडी गोड जिवाचा
तिथें रंगला दोन घडीचा
तो नवलाचा डाव
रंगला, तो नवलाचा डाव

ठाणे ग्रंथ संग्रहालय ठाणे

---

# सकाळचं ऊन

[ छंद–स्मर ]

सकाळचं कोवळं ऊन    खुले कसं छान
नव्या नवलानं आलं    फुलून हें रान

निवांत या झोपडींत
घुमे वसंताचं गीत
धरी ताल मंद वारा    नाचे फुलपान

गोड तुझं घेतां नांव
मोहरलं माझं गांव
लकाकते वाटेवरी हिरवी कमान

शिणगार चैत्रांतला
आवडला धरित्रीला
तुझ्या बांसरीनं राया    हरपलं भान

बहरला नदीकांठ
पडे तुझी माझी गांठ
किती ऊंच नेत जीवा    प्रीतिचं विमान

## वादळ

[ जाति—केशवकरणी ]

सुटला वारा सोसाट्याचा    खळबळ माजे जळीं
नाव ही सांपडली वादळीं

दूर राहिला तीर जिवलगा    धीरहि नुरला उरीं
चमकती विजा वर्षती सरी

काळरात्रिचा खेळ चालला    आभाळच फाटलें
यमाचे दूत मेघ वाटले.

नको बावरूं सखे लाडके !    अेक धरी खातरी
संकटीं भाव जिवा सांवरी

लाटांत अुसळत्या  अढळ आपुली जोडी
दु:खांत सुखाची  अबोल मावे गोडी
वल्हवूं जोडिनें पैलकिनारीं होडी
मरणच ये तर एकपणानें आपण दोघे मरूं
परंतु प्रेम खरें हें करूं !

---

# शाळेंतून जगांत

[ जाति–जलधारा ]

गोड किती आठवणी दाटती उरीं
लोचनांत अश्रु उभे राहती परी

जीविता नवी आतां लागली दिशा
अंधुक अन् मुग्ध कशा भासती दिशा
उत्कंठित पद पुढतीं ठेविला जसा
तों नसानसांत उठे भीतिचा ठसा
बगिचाचे काटेरी रान तें ठरे
तळमळतीं अति कोमल फूलपाखरें
नवलकांति विरली ती सुप्रभातिंची
आग सभोंवार भरे भर दुपारची
हृदयास न विहराया स्थान भूतलीं
कोसळतीं सोनघरें तीं हवेंतलीं
झोंबुनि अनिवार झळा होत काहिली
वणवणतां विरघळली गार सावली
कासाविस प्राण कसा ताण लागला
ओठावर ओसरला सूर आंतला १

शाळेहुनि बाहेरिल विश्व वेगळें
जीव भावनावश तो तेथ गोंधळे
घरट्यांतुन प्रथम सान पाखरूं अुडे
कल्पनाहि त्या नाहीं गगन केवढें
वादळांत दूर कुठें जान सोबती
घन तिमिरीं साथ करी ज्योत जागती
समर गमे जीवन—नच खेळ गमतिचा
'भीरु पडे शूर चढे', नेम नियतिचा
येथ तरी भाव गुणा येत ना सदा
पावती न सर्व फुलें देवतापदा
अुन्नत करि अवनतास यत्नसंगती
सार्थकता जगण्याची अेक सत्कृती
स्वानुभवीं संसृतिचें चित्र तें ठसे
"जग विशाल विद्यालय" शोभलें जसें २

---

## कशाला बोलविसी ?

[ जाति–सृष्टिलता ]

वळुनी मागें पुन्हा
कशाला, बोलविसी साजणा !

अुशीर झाला घरास जाया
थांबविसी कां मजसीं वांया
झऱ्यावरी या पसरे छाया
काय हवें सांग ना !

हसतां तारा नभीं लाजरी
करील चुगली वायूलहरी
येत कुणीतरि अशा अवसरीं
हिणवाया आपणा

भुलवित भोळ्या फुलराणीला
सोनेरी हा किरण निघाला
चैन पडेना परी मनाला
ओळख पटल्याविना

---

## खेड्यांतील जीवन

[ सुनीत ]

गेली कोमल पालवी करपुनी नाचे अुन्हाळा वनीं
झाली अैन दुपार आग फुलुनी आली चहूंबाजुंनीं
आटे रानझरा कुठेंतरि कशी किंचाळते कोकिळा
खेड्यांतील अबोल त्या नवतिचा कोमावला कीं मळा

आशा ती सुटली कुणास जगतीं झोंबे निराशा जरी
भोळा शेतकरी निगा जमिनिची राखी फुटोनी अुरीं
धीराचा हलकेंच हात धरुनी बांधाकडेला बसे
शोकें व्याकुळ सृष्टिची अवकळा त्याच्या मुखीं येतसे

दु:खाचे घुटके गिळीत चघळी ओली सुकी भाकरी
आणोनी अुसनी अुमेद अुचली पाअूल कष्टावरी
जाणारा दिन देत साद चढत्या चिंताश्रमांचे मनीं
वाटे अंधुक वाढत्या गरिबिचा चाले घरा तो धनी

घाली भूल निशा अुठे दचकुनी स्वप्नीं जिणें नांगरी
त्याचें चित्र सुरेख रेखित परी माया रमे नागरी

## घरधनी रानीं गेला

[ छंद–मोहिनी ]

घरधनी रानीं गेला भल्या पहाटेला
अजुनी कां नाहीं आला किती वेळ झाला

पळे ऊन सावलीचा डोळा चुकवून
घुमे दूर घुंगुरांचा सूर हा मधून
दिस बुडे झाडांमागें हळू न्यहाळून
सुटे पाखरांची शाळा, फुले भाव भोळा

हसे सांज आभाळांत लकाकला तारा
सोनसळी कशी खेळे झांकळे पसारा
बोलावीत पावसाला खुळावला वारा
कोण शीळ घाली, लागे काळजी जिवाला

झुले आंबराओ काळी लपेटून झूल
झोपडींत ज्योत जागे भरे नवी भूल
थरारलं अंगणीं हें गुलाबाचं फूल
आतुरली राया माया तुला बघायाला

## त्या दिवशीं

त्या दिवशीं या बागेपाशीं गांठ पडे आपुली
जादुनें दोन मनें भारिलीं

मधुर काय जें वाटे जीवा न बोलतां कीं पटे
शिरशिरी गोड शरीरीं उठे

फुलवी कणकण आकर्षण तें पहिल्या भेटींतलें
भासलें बंधन ओलांडलें

सूर मिळवितां रम्य कल्पना भान विरे साजणा!
प्रीतिचा रंग चढे जीवना

चांदण्यांत नाचे अथांग पाणी निळें
दोघांच्या नयनीं विश्व नवें रंगलें
जिवलगा तुला मी हर्षभरें बिलगलें

क्षणांत एका उलटे नौका, मिठी सुखाची सुटे
निघालों वहात आतां कुठें!

---

## माझें घर

[ जाति–नववधू ]

आठवते मज तें घर माझें
रंगलें जिवाचें राज्य जिथें

अुधळित सोनें सरसावे दिन
अुडे बागडे आनंदें मन
कसें मोकळें खेळे जीवन
दिव्यता रूप घे आवडतें

प्रकाशसुमनीं अंगण डोले
चिमणी मैत्रिण मंजुळ बोले
रोप चिमुकलें तिनें लाविलें
हासरी अुभी ती वेल तिथें

गांवाजवळुनि वाहे ओढा
पडे रानझुडुपांचा वेढा
गातां कोकिळ वसंतवेडा
आंब्रेबन मोदें मोहरतें

शाळेला कधिं सुटी देअुनी
वनराणीची अैकत गाणीं
स्वैर भटकणें राअीमधुनी
नित्य नवी शोभा लोभविते

बाळमित्र माळावर जमती
गमतीचे किति खेळ चालती
मेघ नभीं नवलानें खुलती
अिंद्रधनू नयनीं चमचमतें

स्वप्नें फुलतां नवरंगाचीं
नाचे दुनिया बाळपणाची
लागुनि गुणगुण तिनिसांजेची
ये दारीं आअी आतुरतें

स्वर्ग रुचिर तो मुकला आतां!
पतंग तुटला अुंच विहरता
काळोखी ही रात्र हिणवितां
पंजरीं पाखरूं तडफडतें

---

## भरारी

[ जाति–अचलगति ]

ये सजणी बाहेर झणीं
बावरसी तूं कां अजुनी ?

गगनीं संध्यारंग खुले
भूवरि शोभा नवी फुले
मुरकत हिरवें रान पहा !
मोहन तारा हासत हा
ओलांडुनि ही चाकोरी
भटकूं दोघे कुठेंतरी

दिव्य फुलांचा गंध भरे
शीतळ वायू मंद फिरे
तुषार उधळी स्वैर झरा
हिरवाळीवर बसूं जरा !
नाजुक पानें गुणगुणतीं
सुंदर छाया रुणझुणती

हसरी रजनी फेर धरी
नाचत आला चंद्र वरी
पंख जिवाचे पसरीत
घुमवूं जीवन-संगीत
हात गळां हळु घालुनिया
स्वप्न सुखाचें पाहूं या !

गोड मनाला छंद जडे
थरथरसी कां सांग गडे !
खेळ रंगतां प्रीतीचा
डोळे चांफा नवतीचा
साठवितां मधुबोल उरीं
बोल कुठें लपलीस तरी !

---

# हेंच कां प्रेम !

[ जाति—लीलारति ]

आलीस ज्या दिनीं माझ्या तूं जीवनीं
नाचवी लोचना अेक नवी मोहिनी
मधुचित्रें रेखित मन वेडें रंगलें
हळु वाढे गोडी वेड तुझें लागलें

हृदयाची वीणा आवडिनें छेडितां
दोघांसहि मोही अबोल ती दिव्यता
या लतामंडपीं बहर प्रीती कशी
आशेची सुंदर अुभी मयसभा जशी

परि पुढें अबोला आवडला कां तुला ?
अेकेक दिवस हा युगापरी भासला
अेकलेपणाची घोर भोगतां सजा
भेटिचा अचानक निरोप आला तुझा

ही सांजतारका नवलाची जाग दे
अुत्कंठ अुभा मी निवांत बागेमधें

आठवितां पहिला भाव जित्रा वाटलें
लोपेल निरंतर अंतर दोघांतलें !

ढाळीत आसवें येशी सामोरुनी
वदणार काय तूं अुमगे मज तें क्षणीं
पांगली त्याक्षणीं मोहन स्वप्नावली
ती अमृतबोली ओठांतच राहिली

भेटशील आतां पुन्हा कळेना कदा
'हेंच कां प्रेम तें,' सांग परी अेकदां !

## माझी शाळा

[ छंद–ओवी ]

तुझ्या मंदिरांत माते ! अनंताची जागे ज्योत
स्मृतिचित्रें अुजळीत तिच्या मंद प्रकाशांत
तुझी शांत मूर्ति आअी ! दिसे सदा माझे डोळां
मुग्ध रूपें आनंदाचीं तुझ्या घरीं झालीं गोळा

मोकळ्या या अंगणांत आयुष्याच्या अुष:कालीं
दाही दिशांचीं पाखरें खेळावया मोदें आलीं
सुरम्य बाळपणाचीं किती गोड गाणीं गात
निळ्या नभींच्या तारका रंगल्या कीं नवलांत

तुझ्या पुण्यपायीं देवी ! वसे स्वर्ग समतेचा
आणि मंजुळ भाषणीं वाहे झरा अमृताचा
चिमण्या बाळांच्या शिरीं घातलीस स्निग्ध छाया
सुकुमार अंकुरांना मिळे मंगलाची माया

करुणेच्या किरणांनीं   जिवा दाखविली वाट
निराशेच्या तिमिरांत   खुले आशेची पहाट
नसे सीमा तुझ्या प्रेमा   तूंचि भाग्याचें निधान
तिन्ही जगांचाहि धनी   तुझ्या कृपेवीण दीन

शीतळ त्या सावलींत   घेत विश्वाची चाहूल
स्वप्नें सुखाचीं पहात   फुले जीवनाचें फूल
घुमे कानीं दिव्य वाणी   असे आतां जरी दूर
बोलतां ही "माझी शाळा"   भरे अभिमानें ऊर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## मोहक तारा

[ जाति–नवरंग ]

एक तरी मोहक तारा
दाविल आतां वाट मला
मेघनाद गगनांत घुमे हा
जीव थरकला एकला

रानफुलाचा मिटतां डोळा
बोल सख्या ! तव आठवला
शोधित घरटें फिरे पाखरूं
भिरभिर वारा भेटला

उजळुनि क्षणभर वनतिमिराला
लपली चपला चंद्रकला
मधुर गीत रजनीचें विरलें
अंधुक दीपहि लोपला

राहिलास कां दूर जिवलगा !
नाहीं करुणा कशी तुला
तुझ्याविना या भयाण जगतीं
अन्य गती ना प्रीतिला

हासे शांत अथांग सागर हळू हेलावतां नीलिमा
दारीं वारुणिच्या विलीन रविचा रेंगाळतो लालिमा
लाटांचा अुमटे निनाद मधुनी निःशब्द तीरावरी
छाया झांकळल्या बनांत झुलतां चित्कार वारा करी

दीपस्तंभ पहात रूप अपुलें फेंसाळ पाण्यामधें
होडी धूसर दूर डोलत तिला कोणीतरी साद दे.
झाली व्याकुळ तारका, मुख क्षणीं झांकी क्षयी चंद्रमा
विश्वाला बसला कसा बिलगुनी शांतींतला कालिमा

घेतें वेंचुनि कोण तें पलिकडे वाळूतुनी शिंपले
लोपे वीज लकाकुनी क्षणभरीं आभाळ भारावलें
स्वार्थाची फिरतां भुतावळ निशा भेसूर काढी स्वर
आला आंतिल आगिनें अुसळुनी गंभीर रत्नाकर

मेघांच्या हृदयीं तुझ्या प्रगतिचा झेंडा भिडे हा नवा
काला वांकविण्या पदीं बल कधीं लाभे तुला मानवा !

## जाअूं परतीरा

[ जाति—शुभवदना ]

सरसाते सुंदर हा तिमिरांतुनि तारा
ये सखये! अेकपणें जाअू परतीरा

जल अथांग संथ दिसे भंवती शांति वसे
कसली तरि आतुरता हृदयीं मावतसे
नील नभीं रजनीचें स्वप्न नवें विलसे
परि नयनीं फिरफिरुनी भरती अश्रु कसे!
नवसाचा क्षण साधी सांवरुनी धीरा

भावगीत वनबाला गाते सुमनांचें
रंगवितां श्यामघना चंद्रकला नाचे
गुलगुलती तरुलतिका शांत किनारीं या
चाळविती हिरवळिला ओझरत्या छाया
सांठवुनी खूण मनीं बांध झणीं पदरा

थरथरती जललहरी भुरभुरतां होडी
थयथयतें मन पहिली पालवितां गोडी

बोल गोड बोल गडे ! भय आतां सोडी
मंद चांदण्यांत खुले प्रेमळ ही जोडी
गुणगुणुनी हळु कानीं शीण हरी वारा

कोलाहलिं अंतरला प्रीतीला थारा
विटलें हें जीवन त्या स्वार्थी परिवारा
सुप्रभात वाट नवी दावित जीवासीं
रागलोभ जगताचा विसरूं सहवासीं
रानपाखरा न रुचे पंजरिंचा चारा

---

## थांब जरा !

[ जाति—दासी ]

थांब जरा वाटसरा !
सुके कळी क्षितिजाची दिन जातां दूर घरा

मधुर सूर ओसरला
बावरली तरुबाला
महिवरला रंग विरे गहिंवरला रानझरा

पायवाट काजळली
जीवकला झांकळली
घेत मुखीं बुरखा नभ सोडित कां सुस्कारा ?

छायांकित शांति वसे
दीप निशेचा न दिसे
चपल वीज चमचमते रिमझिमतां जलधारा

सांवरीत प्रीत फुलां
देते पाथेय तुला
फिर मागें मुशाफिरा ! नच मागे मुशाहिरा

अेक रात्र सांगाती
घालवुनी जा पुढतीं
अुजळी पथ मुग्ध अुषा जागवितां भाव खरा

---

निरोप ने मेघा, माझा
दीन जिवाचा दाह निवारी करुणेच्या ओघा !

खुले वैभवें कुबेरनगरी
गिरिराजाची शोभा गहिरी
भूवरि वाहे धवल यशाची सुंदर सुरगंगा

तिथें प्रिया ती आतुर आहे
विरस सुखाचा केला विरहें
भिजविल झुरतां अश्रुजलानें घरांतील जागा

वाट बघे मम कमललोचना
तिजविण मजही मुळीं गमेना
धीर मना परि देउनि आशा फुलवी अनुरागा

सांग सखीला, ' नकरी चिंता
येइन मी झणिं शाप संपतां
रमविल मोदें मधुरमीलनीं चांदरात दोघां '

## कोण ती गुणगुणते !

[ जाति—नववधू ]

पलिकडे कोण ती गुणगुणते !
नादांत रान त्या रुणझुणतें

सोनकणांनीं कणसें नटलीं
रमली माया साधी भोळी
रेखिव काया खुले सावळी
चपळतें विळा कशि चालविते

मधुर सुरांची भरे मोहिनी
फिकी तिजपुढें कोकिळवाणी
रंगत गातां शारदरमणी
कीं सजीव काव्यच रुमझुमतें

नादावुनि वनवारा नाचे
आलें फुलुनी मन धरणीचें
दिवसाहि विसरे मावळण्याचें
नवजीवन तेथें झुळझुळतें

मेघ रमे नवलांत नभींचा
डोलत मोर्दे गिरी दूरचा
बंध हरपला मुग्ध फुलांचा
जणुं अमृतधारा रिमझिमते

जरा बाजुनें जपून जाणें
लाजेल झणीं मंजुळ गाणें
बुजे पाखरूं गोजिरवाणें
सुखस्वप्न त्यासवें पळेल तें

स्वरलहरी हळुवार पसरतां
प्रगटे त्यांतिल खोल करुणता
तरिच तयां ये अशी मधुरता
ती जादू हृदयीं थयथयते

## त्या बाजूला-

[ जाति-नववधू ]

घर तिचें असे त्या बाजूला
जोडिदार तिचा दूर गेला

षण्मासाचा सरे वायदा
मिळे तिला तें पत्र अेकदां
लगबग ये बाहेर कितीदां
अंगणीं मोगरा मोहरला

तिनिसांजेचा सूर पसरला
पडे निराळी भूल जगाला
हुरहुर लागे गोड जिवाला
आज तिनें साज नवा केला

वाटेवरली वर्दळ विरली
वाट पाहतां वेळहि टळली
सामसूम भंवताली झाली
तळमळे मनीं ती वनमाला

गार रात्रिचा वारा वाहे
दाराला ती रेलुनि राहे
मिटल्या नयनीं मीलन पाहे
कोण हळुच कानीं गुणगुणला !

बावरली झणिं भोळी बाला
चाहुल घेतां तारा ढळला
गालावरुनी अश्रु निघाला
त्यांत तिचा दिसला चंद्र तिला

---

## वाटेवरचा दिवा

[ सुनीत ]

आहे तिष्ठत अेकला दिस किती मी दूर वाटेवरी
येतां दृष्टि मला क्षणांत हसरी सृष्टी दिसे बावरी
बाजूला झुरती शिला, विखुरलीं रानीं फुलें नाचरीं
सोसावा वनवास दारुण कसा, काहूर माजे अुरीं

काळाचे पडसाद अेकत अुभे देअुळ भारावलें
ढाळी अश्रु मिटून नेत्र नभही सायंप्रभें भारिलें
घाली साद झरा घरा परतुनी जातां पुजारी मुका
गाभाऱ्यांतिल मंद वात जळतां दे हुंदका देव कां ?

अंधारांत फिरे मुशाफिर कुणी, व्याकूळ तारा बघे
रात्रीच्या हृदयास भेदुनि झणीं गंभीर वाणी निघे
जीवाचे विसरून बंध अपुल्या स्वप्नांत नाचे कला
छाया सांगत शांतिची कुळकथा आसावल्या प्रीतिला

आला भीषण लालिमा जगतिला या क्रांतिकालांतला
कोणाला कधिं कां कळेल विजनीं जें काय वाटे मला ?

काय बघे थांबून, मुशाफिर

टेकित काठी अुचली पाया
दिन मावळला दावुनि माया
पसरे रानीं धूसर छाया
फार दिसांनीं तो निजगांवा ये फिरुनी लांबून

मेघ अवेळीं गगनीं वळला
वारा हसतां तारा रुसला
वेशीवरला दिवाहि ढळला
चाहुल धीरें घेत पुकारी घरापुढें राहून

तळमळ वाढे वादळ दाटे
कसे फुलांचे झाले कांटे
वेगळेच तें जग त्या वाटे
वेडी आशा ओढी हृदया, कोण घुमे मागून ?

गमला वांया बोल जिवाचा
तुटतां धागा तो शेवटचा
दिपवी डोळा लोळ विजेचा
अेक करुणसा नाद निघाला तिमिराला भेदून

## मूर्ति आणि ज्योति

[ जाति–दिंडी ]

देवळाचें करी बंद गुरव दार
भरे भंवताली गडद अंधकार
वीचि अनिलाची व्याकळून आली
अेक तारा निखळून पडे खालीं

बकुळ बाहेरीं स्तब्ध अुभा राहे
आंत सुस्कारे कोण देत आहे ?
कळी पायदळीं दु:खकळा साहे
मान अुंचावुन कळस तीस पाहे !

शांत गाभारा, झांकळे पसारा
मोर डुलकी घे झांपुनी पिसारा
गस्त वनगांवीं दिवाभीत घाली
कशी अेकांतीं शांति विकल झाली !

देव रात्रीं त्या मंदिरांत जागा
मंद तेजें अुजळीत दीप जागा
जुन्या पानांचा साद पुन्हा येअी
मूर्त बोले हळु ज्योत कान देअी

" निरस माझा सहवास सये ! सोडी
जडा आळवुनी काय जडे गोडी ?

अतां स्वहिताचें पहा ! कुठें धाम
गुलामांची कीं मी असे गुलाम ”

शुभांगीला ती प्रभावती सांगे
“ स्नेह लाभो तव नान्य कामना गे !
तुझें मधुर स्मित होत सुधा जीवा
खरी प्रीती निरपेक्ष करी सेवा ”

दुज्यासाठीं जगण्यांत जिणें साजे
हसे त्यागी सुख दुःख तसें लाजे
वनीं अुमटे मधुनाद अंतरींचा
रंग मावे तिमिरांत जागृतीचा

मुखीं प्रतिमेच्या अश्रुझरा वाहे
नवा अुजळा निर्माल्य पदीं लाहे
वदे करुणा, “ साजणी ! झणीं जाअूं
गीत समतेचें अेकमतें गाअूं ! ”

भूमि थरकांपे काळ दे निवाडा
तोंड वासुनि तो पडे कोंडवाडा
रिघे घरिंदारीं मूर्तिसवें ज्योती
अुषा जगतीं हळुवार हृदय ओती

---

## शाप

[ जाति–दिंडी ]

रम्य लाभे सहवास वसंताचा
रंग बहरा ये रानरागिणीचा
माळ घाली जिवलगा लताबाला
कोकिलेचा आलाप गोड आला

नवी शोभा वरि आश्रमास शांत
आंत मुनिकन्या बैसली निवांत
वृत्ति तन्मय हो मुग्ध भावनांत
कळी विलसे कीं कोवळ्या अुन्हांत

हात अुजवा हळु सांवरी अुराला
दुजा पदराशीं करी अुगा चाळा
दलें मिटुनी घे लोचनांबुजांची
धरी बिंबाधर सुप्रभा स्मिताची

प्रणयरंगें रंगलें अंतरंग
अुठे हर्षाचा अंगभर तरंग
मूर्ति मोहक ती अुगवत्या अुषेची
फुले लीला रमणीय यौवनाची

तिला लाजे सुविलास त्या रतीचा
तसा थिजला अभिमान दिव्यतेचा
स्वर्गवासा कीं विटुनि चंद्ररेखा
तपोभूमीला अवतरे सुरेखा

सख्य दुर्लभ पण कामनाफळाचें
पाहवेना दैवास सुख जिवाचें
जरा गुंगत फुलपाखरूं भरारे
घेर घाली हळुवार गार वारें

कृष्णछाया वेढीत रम्यतेला
कोपराशी दुर्वास तों अुदेला
'कोण आहे'? तो गर्जला त्रिवार
न ये कोणी तरि, होत चकित फार

जिची स्वानंदीं लागली समाधी
दिसे त्याला ती शकुंतला साधी
जिला नाही मुळि भानही स्वताचें
कशी स्वागत साधील अतीथीचें!

तिची बाधे मूकता तापसाला
हृदीं सारा अुसळून राग आला
शापरूपें वदनांतुनी निघाला
जसा वारुळिंचा नाग लाल झाला

"तुझा घेवोनी छंद मनीं ज्याचा
फोल केला या बोल याचकाचा
तुला वेडे! विसरेल तुझा राया"
आग पांखडली फुलावरी वांया!

---

चहुंबाजूला पाहूं जातां अंधारच दाटे
नैराश्याचे बोंचुनि काटे ऊर तसें फाटे
तुडवित धीरें वाट सख्या रे! आलें येथवरी
जायाचें किति अजुनी पुढतीं, मजला सांग तरी

गोंधळुनी मन गेलें माझें तुझ्यापरी सखये!
फिरणें मागें परंतु नलगे, अशीच हासत ये
कुणी आंतुनी अस्फुट वचनीं ही ग्वाही देते
'अचल पाय तूं', होवो अपुलें काय व्हायचें तें

योजियलें जें काय एकदां मनिंचें पुरवाया
असो कसेंही आतां त्याचा विचार तो वांया
प्राणपणें हा अंगीकृत पथ आक्रमणें भाग
शिरीं कोसळो अभाळ, उसळो सभोंवर आग

जरी काळजा चिरी चराचर हत्यार मरणाचें
निशाण हातांतलें सोडणें ब्रीद न शूराचें

वाण सतीचें सुखें घेतलें अ.पण दोघांनीं
स्वप्न पहावें तें अुघड्या वा मिटल्या डोळ्यांनीं

वेळ गमावूं नको गडे झणिं पाअुल टाक पुढें
बंधांतुनि सुटण्याचा जीवा अेकच छंद जडे
गांठूं शिखरा अज्ञाताचें अैकत संगीत
दिव्य सुखाची पहाट दाविल मधुमंगल प्रीत

जीवनवीणा छेडित झरझर मधुर सूर पसरूं
घाव झेलुनी हृदयें फुलतां भेदभाव विसरूं
काळ आवडी चढविल अपुल्या कलेवरां लेणीं
कला मनोहर तिथेंच निर्मिल कोरिव नवलेणीं

पाजळुनी अंतरिंच्या ज्योती नव्या जगीं जाअूं
मरुनी जगतां स्वातंत्र्याचें गीत गोड गाअूं
नकळत तुटती मानवतेच्या पायांतिल बेड्या
त्या आनंदें त्याक्षणिं होतिल दाहि दिशा वेड्या

---

## कोणीकडे ?

[ सुनीत ]

सायंकालिन कांतिनें झळकतें आकाश अेकीकडे
सोन्यानें तिकडे कसे मढविले विक्राळ काळे कडे
ओसंडे हळुवार दूर हिरव्या राअीवरी रक्तिमा
झाली दंग परी कळे न कसल्या स्वप्नामधें पश्चिम।

पूर्वींच्या अपुल्या अपूर्व विभवा पूर्वा मनीं आठवी
दाटे अस्फुट हुंदका करपल्या आशा कळ्या सांठवी
चाले शैलसुता कटाक्ष फिरता कांठावरी टाकितां
सेवी मूकपणें प्रकाशलहरी छायेसवें अेकता

काळेल्या क्षितिजास देत अुजळा ये शांतितारा जसा
सृष्टीच्या अुमटे अुदास वदनीं मंदस्मिताचा ठसा
घेते आपण आवडी विषमता ओवाळुनी आरती
काळोखांतुनि खेळवीत समता अज्ञात कालाकृती

आकांक्षा विजयी अुफाळुनि बघे मंदावतां चौघडे
हुंकारीत अमूर्त शक्ति जगता खेचीत कोणीकडे ?

## शांतीचा प्रतिध्वनि

[ सुनीत ]

गेले घेउनि मेघ दूर बघतां सायंप्रभेच्या स्मिता
कांहीं मोहक आठवीत विजनीं बाला कुणी विस्मिता
विश्रांतिस्थळ शोधुनी वनभरी भारावल्या सावल्या
त्यांना दावित वांकुल्या हिमकळ्या बागेंतल्या त्या निळ्या

रात्रीनें तिमिरांतली पसरली जादू नवी भोंवती
झाडें पेंगुळलीं मधेंच लहरी वाऱ्यासवें डोलतीं
स्फुंदे अंधुक पाजळून दिवली माळावरी झोंपडी
आकाशीं टक लावुनी पलिकडे ठाके मुकी टेकडी

लोपे अिंद्रधनू कुठें रुचिर तें भाळूनिया लोचनां
प्रीती व्याकुळ काय सांगत हळू घायाळल्या जीवना
आशेनें अुमलून मुग्ध सुमनें धूळीमधें लोळती
काळाच्या अुदरीं अनंत लपलीं रत्नें कुणा लाभती !

शांतीच्या मधुमंदिरीं दुमदुमे मंदध्वनी क्रांतिचा
अश्रूंच्या अभिसिंचनीं विरघळे आनंद अेकान्तिचा

---

## सावळी

[ जाति–बालानंद ]

म्हणो सावळी कुणी तुला
होशी प्रिय तूं तरी मला
मुग्ध मुखीं मधुभाव फुले
वाटे हासे कमल निळें
डोळे काळेभोर तुझे
नाचे बघतां मन माझें
केशपाश हा स्निग्ध तसा
शुभ्र फुलांनीं खुले कसा

साजे नाम तुझें श्यामा
नाहीं अुपमा त्या प्रेमा
रेखिव काया निमगोरी
नवतीचा शिणगार वरी
अस्फुट वचनीं जादु वसे
लाजत ये सुखस्वप्न जसें
गोड निळ्या वातावरणीं
खेळे मोहक फुलराणी

गूढ आणि रमणीय गमे
निळी मोहिनी तिथें रमे
सांज नभीं नवरंग भरी
सागरशोभा भान हरी

गर्द सावळ्या पालविनें
दिसतीं सुंदर किती वनें
फुलवित मोदें वसुधेला
विलसे श्यामल वनमाला

निवांत रानीं गिरिशिखरीं
दिव्य माधुरी वास करी
खडकाळींतुनि रुणझुणतां
पसरी निर्झर सुंदरता
अुजाळित धूसर क्षितिजाला
चमके मंगल चंद्रकला
विहरत करुणा शांतिसवें
गगनश्री घे रूप नवें

कृष्णानिशेच्या कुंजांत
गाते आशा मधुगीत
झळके तारा घनतिमिरीं
मधुर अुषा हळु येत वरी
सुखवी प्रियसहवास जिवा
छंद कशाला दुजा हवा
लाजुं नको ये, सांग तरी!
जादुगिरी ही कोण करी?

---

मंदगतीनें वनराईंतुनि विलसे जलवाहिनी
नाचतें गीत तिचें निर्जनीं
प्रशांत सलिला प्रभा लाजरी वितरी मधुलालिमा
न्याहळी मावळता चंद्रमा
नीलिमा नभींचा प्रवाहरूपा वरी
माधुरी वनींची विहरे कीं हांसरी
अवतरे गिरीची रसवंती भूवरी
तरुलतिकांची कुजबुज चाले मोहन छाया झुले
समंतीं मंजुळता झुळझुळे

रंगित तीरा सलीललहरी खुणाविती प्रीतिनें
रंगलीं विहगांचीं कूजनें
दंवकणिकांनीं सकाळ कांहीं लिहिते मृदुपल्लवीं
जगाला मंगलता जागवी
विरघळे नाचरी पहाटची चांदणी
जलभरणा आली चपल रानरागिणी
मोहिनी घातली तिला कळेना कुणी
हरितसुंदरी नवदिवसाचें सुस्वागत साधिते
अनाथा आशा वेडाविते

घाट सावळा अुघडी डोळा अश्रु हळू ओघळे
जवळचें देवालय भंगलें
मूक कहाणी अैकत खेडें कण्हतें अेकीकडे
सरेना गरिबीचें सांकडें
वायाळ जिवांचीं स्वप्नें जीवन बघे
मरणांत आजच्या कला अुद्यांची जगे
अुगवत्या युगाचा निनाद वदनीं निघे
बंध कळीचा अुकली वारा, दूर घुमे बांसरी
चालली विलासिनी सागरीं

## फुलांचें गाणें

[ जाति–भूपति ]

जशि आली क्षितिजा नवतेजाची लाली
स्वप्नांतुनि सुंदर पृथ्वी जागी झाली

गगनाची राणी अमृतबिंदू अुधळी
रंगली मधुरता हिरव्या छत्राखालीं

हेलावे सागर सोनेरी लहरींचा
दंगला नर्तनीं मेळा मधुसुमनांचा

बहुरंगी जीवन बहरे रानपऱ्यांचें
संमेलन भरलें स्वच्छंदी ताऱ्यांचें

गंधर्वनगर कीं वसे वनीं नवलाचें
मधुर भावनांचा स्वर्ग भूवरी नाचे

घेअुनी मनोहर रूपें आनंदाची
विनटली कल्पनासृष्टी काव्यकलेची

सावलींत शीतळ हसऱ्या कलिका रमती
जणुं मूकमनांच्या भावज्योति चमचमती

चिमण्या बाळांना दृष्ट न लागो म्हणुनी
वनदेवी भंवती ठेवी जादू भरुनी

प्राणसख्यासाठीं मोहक हार कराया
मी आलें मोदें, अमोल खेळे माया

त्या दिव्य वैभवें लोचन लोभी दिपले
खोल कुठें हृदयीं काय सले तें नकळे

मावळे परी हळु सकाळची सुखशोभा
लोपली लाजरी आशा दाविन लोभा

राहिली न पहिली रंजकता किरणांची
खरी कळा प्रगटे मायावी दिवसाची

शोभली मुग्ध जी प्रकाशांत सुंदरता
छायेंत झांकुनी मुख ती राहे आतां

निःश्वास पसरतां व्याकुळ फुलवंतीचे
अनिवार विषादें अूर फुटे धरणीचें

किति सजीव चित्रें सुरम्यतेचीं खचलीं
तिळतीळ तुटे मन, फुलें न वेंचुनि झालीं

कशि सौंदर्याची चाले निर्दय हानि
निष्पाप जिवांची गुंफिल कोण कहाणी !

प्रीतिला जगीं या कठिणच झालें जगणें
तें गेलें कोठें गोड फुलांचें गाणें ?

## भिकाऱ्याचे बोल

[ जाति–चंद्रकांत ]

अेक असे मी रंक जगीं तूं भाग्यवंत राजा
आलों दारीं अैन दुपारीं अैक बोल माझा
तव नामाचा दुमदुम डंका वाजत रातदिसा
आहे हातीं तोंवरि पदरीं घाली मूठपसा

केली ज्यानें तुझ्या हवालीं दौलत ही मोठी
दुनियेचा तो धनी मला दे लोटीलंगोटी
स्वर्गसुखाचा खजिना भासे तुझा राजवाडा
अुभा भिकारी झोळीमधला खात शिळा तुकडा

आपण दोघे पण रहिवासी अेका गांवाचे
समजेना तें तुझ्या मनातें नातें भावाचें
बघते अुघड्या गरिबीला ती श्रीमंती वांया
कसा कळावा भाव फुलाचा दगडाच्या हृदया

केली सलगी म्हणुनी राया! राग तुला आला
पहा! वाढला अुंच माड हा हासे गवताला
घे मुजरा झणिं आणि अतां मी जातो ज्या वाटे
येशिल तूंही माझ्यामागुनि तुडवित हे काटे

# साखरओढा



वाहतो हाच तो झुळझुळ साखरओढा
ज्याकडे जिवाचा जडे सारखा ओढा

किति लाल कण्हेरी लाजत बघती अिकडे
कुजबुजतीं हलकें जाळ्याझुडुपें तिकडे
तळपती पलिकडे अुन्हांत कातळ अुघडे

डोकावे मधुनी बागमळा अेकादा
सावलींत चाखी कुणबी भाकरकांदा १

ती होत निमुळती वाट निघाली पुढतीं
घुमवीत लकेरी रानपाखरें फिरतीं

कधि माळावर ये स्वैर कळप हरिणांचा
राअींत रंगला खेळ नवा किरणांचा
कुरणांस नाचवी पावा वनपवनाचा

वाढलें वडाचें झाड मोकळ्या जागीं
लावुनी ध्यान कीं बसे कुणी बैरागी २

देअूळ मोडकें बनेश्वराचें ठाके
छत्र शिरीं धरितां औदुंबरही वांके

गुणगुणते खालीं पाणवठ्याची माया
गुजगोष्ट सांगते सांजसकाळीं छाया
किति अुंचवट्यांची खुले सावळी काया
पेंगुळतां वेळू चाहुल घे हळु लिंब
निवांत वनबाला बघे जळीं प्रतिबिंब ३

स्फुंदतां चांदणी साद कोंबडा घाली
भोळ्या गरिबीला भुलवित आशा आली
रुणझुणते गगनीं झुंजुमुंजुची राणी
झोपडींत घुमतीं जात्यावरचीं गाणीं
अुगवत्या पिकांची अुमटे अस्फुट वाणी
घुंगूर वाजती राजापरधान्याचे
श्रमांतुनी पिकतें समाधान हृदयाचें ४

माळ्यांवर कोठें फिरवी गोफण बिजली
कष्टांची दुनिया सुखीं अुद्यांच्या रिझली
झुळझुळता कानीं मोटेची ललकारी
नक्तीची दौलत पसरी जादू न्यारी
न्याहारीची गोडी वारी शीण दुपारीं
तो बहर सुगीचा साज नवा दे गांवा
दाखवी मनोहर सृष्टिकला देखावा ५

वनवेलींना प्रिय वसंतलीला गमली
छेडीत मोकळा सूर कोकिळा रमली
    मग पाउस पहिला धरि नवलाचा छंद
    भेटतो भूमिला स्वर्ग जसा सानंद
    दरवळे मातिचा भंवती मंद सुगंध
कुरवाळित खडकां जिवंत पाणी नाचे
दिनरात ऐकवी करुणगीत जगण्याचें ६

झिडकारुनि गवता भिडला माड नभाला
आम्रतळीं साजे शिलाखंड हा काळा
    येथुनी न्यहाळत शोभा सूर्यास्ताची
    रंगविणें चित्रें भावी आयुष्याचीं
    ही आवड होती माझ्या मुग्ध मनाची
फुलवीत भावना अखंड निर्झर वाहे
तीं स्वप्नें सुंदर आज [illegible] पाहे ७

---

# पहाट

[ जाति–साकी ]

पहाट झाली पहा ! जिवा हळु डोलत ही तरुमाला
मंद कळा खुलतां क्षितिजाची शांत हसे पडशाळा
अुरला क्षण हा अेक सुखाचा, काय मनीं तव आहे ?
निशा संपली परंतु अपुली बोली अपुरी राहे.

गोड गुलाबी स्वप्न पळालें, ओघळ गालीं आला
धूसर तारा देत अिषारा बावरली वनबाला
अुषा लाजरी रेखी गगनीं नवरंगी रांगोळी
टकमक बघतां ओठावरल्या रसाळ विरल्या ओळी

नकळे कसली चुटपुट लागे, पुटपुटली पाकोळी
घेत चाहुली निवांत जागे गुंफित धागे कोळी
होअुनि साथी अिथें कोंदिली अेक रात्र दोघांनीं
जागवील ती मंगलज्योती आळवुनी मधुगानीं

पडतां टपटप थेंब दंवाचे वनींत नाचे छाया
तृणांकुरांना कशी खुणावी मूक फुलांची माया
अुतरुनि येथें अपुल्यापरि ते वाटसरू किति कोणी
मावळले अज्ञात ठिकाणीं, नलगे नांवनिशाणी

पिवळीं पानें सळसळतां ये किलबिल मंजुळ कानीं
अंधुक पुढली वाट अुजळतां भरलें नभ मेघांनीं
सोबतिचे सुखसूर पसरुनी दूर विहंग निघाले
दोन वेगळे ओघ मिळाले आणि निराळे झाले

आग अंतरीं अुसळे भिडतां शीतळ लहरी अंगा
प्रेमाच्या यमुनेला भेटे करुणरसाची गंगा
फिरुनी कोठें गांठ पडे ती फोल कशाला आशा
कळेल कधि कां दुनियेला या मुशाफिराची भाषा ?

# अभागी आओी

[ जाति–दिंडी ]

शिरीं गगनाची लटकते कुठार
भूमिबाला बावरे निराधार
निवे हरिणी पाडसासवें कोठें ?
पुढें संकट राहिलें अुभें मोठें

अुठे करुणेचा सूर जागजागीं
जगीं कोमलता भासली अभागी
फुलां सुटला जाळीत काळजाळ
निजे नवतीचा कीं धनी दयाळ

धरी पोटीं माअुली बाळ तान्हा
अुन्हामाजीं जमवीत अुरीं पान्हा
नाश नाचत ये प्रेतकळा गांवा
कुणी वाली ना पराधीन जीवा

दीन जननीला पारखा निवारा
फिरे शोकाचा सभोंवार वारा
दहा तोंडीं तो दिवस आग ओकी
होत गरिबीला हें जिणें नको कीं

तिला आशेचें दार बंद झालें
चित्र हृदयाचें आसवांत न्हालें

धीर खचला चालतां लाल वाट
भरे मरणाचा आसपास थाट

साद घुमतां वायाळ पाखराचा
प्राण तळमळला गायवासराचा
झुरे बाजूला झाड बाभळीचें
तिला अैकविते गीत सावलीचें

तिथें वत्सलता व्याकळून जात
पडे दुबळी फुलवेल कंटकांत
खोल डोळे किति पोट भकाळीला
तोंड गेलें करपून, घात झाला !

भुकेनें त्या रडवेल बालकाला
हात प्रेमळता मारिते कपाळा
ओठ थरथरती, विरे गोड बोल
हिरा सांवरण्या करी यत्न फोल

चांद अंकीं मावळे तिचा हाय !
गळे माया हो जिव्हारींच घाय
कालिकेची चालली घोर लीला
मिळे माणुसकी जीवनीं धुळीला

---

## अखेरची अिच्छा

[ जाति–दिंडी ]

भरुनि डोळे तुज अेकदां बघाया
तुझ्या दारीं मी असे अुभी राया
आस शेवटची साथ जिवा देते
पुन्हा नाहीं येणार कधी येथें

जरी ओळख तूं विसरलास माझी
स्मृती आहे ती मन्मनांत ताजी
सुटे जिथुनी शर खूण नसे तेथें
खोल अुमटे ती पडेल तो जेथें

मला ठावें, मी तुला नको आहे
तरी आतुरतें वाट तुझी पाहे
नको राहूं या क्षणीं सख्या ! दूर
सूर ओसरतां दुभंगेल अूर

साक्ष देते जग तुझ्या वैभवाची
अेक आहे मी लेक गरीबाची
असा असतांही आपणांत भेद
तुवां आधीं मज लावियला वेध

कुणा नलगे सहवास वद ! सुखाचा
असे फुलणें अपराध कां फुलाचा ?
मुग्ध हृदया रमवीत मधुर लीला
रूप भासे जणुं शाप गरिबीला

गळा गुंतवुनी खेळ तो क्षणाचा
बळी घेअी निष्पाप जीवनाचा
लाभ गेला तरि लोभ कसा जावा
काय होता तो गोड तुझा कावा ?

भरे नयनीं अुन्माद तयावेळीं
भीति ओठीं अज्ञात तशी ठेली
जाणिवेचें त्या तुला हसूं आलें
आणि माझें लोकांत हसें झालें

असो, आतां तें बोलणें कशाला
पूर्वभेटीचा पालवी जिव्हाळा
शल्य काढी हळुवार अंतरींचें
समाधानच हें खरें अखेरीचें

कसा अजुनी राहसी पाठमोरा
किती काकुळती करूं चित्तचोरा !
स्निग्ध वचनांच्या वर्षुनी तुषारा
आग निववी प्रीतिच्या जादुगारा !

घडी साधी ही तिन्हीसांज झाली
भीक करुणेची अेकवार घाली
रात्र अवसेची पसरतां सभोंती
गीत तिमिराचें गात विरे ज्योती

---

## घ्या काढुनि माझा घट

[ जाति–प्रणयप्रभा ]

घ्या काढुनि माझा घट कोणी !
विनवित तरुणी तीरावरुनी

पाझरती जलधारा गालीं
फिरफिरुनी ती सादहि घाली
मंद गतीनें नदी निघाली
पाणी न पितां परते हरिणी

खेळ रंगतां किरणकळींचा
पिचला पावा गोड सुरांचा
मिटला डोळा तसा दिसाचा
पाहतीं पाखरें चिंवचिंवुनी

सांजकळा भंवताली पसरे
रंजिस जीवा आशा विसरे
झुरे सावली कण्हतां वारें
बावरे चांदणी नभीं झणीं

रमणीला त्या हसतां लहरी
रुसली हिरवी शोभा सारी
करुण रूप तें वितळे तिमिरीं
परि एक घुमे पडसाद वनीं

## पराजितांचें गीत

[ जाति–लवंगलता ]

पराजितांचें गीत गावया येथ अुभा मी आहे
निळया नभाच्या जाळींतुनि ही मुग्ध तारका पाहे
पायदळीं पडल्या सुमनांची पसरे शोककहाणी
अस्तगिरीच्या सुवर्णशिखरीं विलसे संध्याराणी

धूसर दिनराजाची अंतिम मंद्रावे ललकारी
धुळींतुनी ती झणीं स्फूर्तिची अुचलुनि वेत तुतारी
घुमवित धीरें अुरांत दबले दुबळ्यांचे आक्रोश
यांत कशाची लाज, अुद्यांचे होतिल ते जयघोष

जादुगिरी विरतां क्षितिजांतरिं अखेरच्या किरणाची
गरिबीच्या घरट्यांत नाचते पडछाया मरणाची
सोनेरी त्या प्रकाशलहरी गेल्या नजरेपार
सळसळतां वन तळमळतें मन, तुटला मोहक हार

अंधारांतुनि फिरती स्फुंदत घायाळांच्या आशा
नकळत नटतां अस्फुट कलिका हासे विकट निराशा
लटके नाजुक मान कलेची परवशतेच्या पाशीं
छेडित सारंगी करुणेची जागे प्रीत अुपाशी

खेळे भीषण शांति, विरघळे हास्य यशोदेवीचें
दिपवी नयना रजनीच्या परि रत्न तिच्या हृदयींचें
प्रिय मातेच्या मंदिरांत या तेवत दीपक मंद
अेकपणाची हांक निवारिल दिन जिवांचे बंध

प्रगतीचा पथ पददलितांच्या रुधिराश्रूंनीं खचला
वास्तवतेच्या चित्रपटाला रंग निराळा चढला
अहंकृतीचा तुझ्या मानवा! कलंक लागे जगता
सातहि सागर हात टेकती त्या अुजळाया बघतां

काळढगांच्या मुठींत मिटल्या लपले लाल सुरेख
अंधुक ध्येयाकृती रेखिती दिव्य सुखाचे लेख
भूक वाढती जेत्यांची हळु हरिते भूल जितांची
पराभवांतहि रुजतीं बीजें भावी शुभ विजयाचीं

अढळच आसन त्यागाचें जरि हारजीत ही चाले
परोपकारी परिश्रमांचें मोल कमी नच झालें
जुन्या जगाचीं स्मृतिचिन्हें तीं तुडवित 'काल' निघाला
घेअुनि स्वप्नें नव्या युगाची 'आज' तसा वर आला

सांवरिला ढळता ध्वज ज्यानीं वज्र शिरीं कोसळतां
वेंचुनि कणकण निजप्राणांचा गौरविली मानवता

स्फुरे अंतरीं ज्या वीरांच्या क्रांतीचें संगीत
सत्वासाठीं आवडिनें जे घेत अुडी आगींत

ज्ञात आणि अज्ञात हुतात्मे झटले जनकल्याणा
समतेच्या साधितां पूजना चला ! आळवूं त्यांना
मेल्याविण तो स्वर्ग दिसेना, वाटे विस्मय काय ?
जाती कोणी पुढें तयांचे ओढुं नका तरि पाय

आओीचे हे अमोल आसूं जातिल कां हो ! वांया
शूर तिच्या बलिदान मुलांचें ठाके साथ कराया
स्वैर अुफाळो कळिकाळाचा झंझावात सभोंती
विझे न कधि जी फुले अेकदां स्वातंत्र्याची ज्योती

---

आभाळाच्या गाभाऱ्यांतिल कडकडली कालिका
तशा धुमसतां दिशा अुधळती रक्तवर्ण मालिका
नेत्रांतुनि ठिणग्यांचा पाअुस पडे तिच्या सारखा
महाकाल हा सखा मिळाला तिला मनासारखा १

तोडुनि टाकित बंध जगाचे घोर घुमे गर्जना
प्रलयाच्या नवलाख बालिका अुठावल्या नर्तना
पडली आ वासुनी विलासी स्वर्गांतिल मंडळी
संहाराची राक्षस-सेना अुतरे भूमंडळीं २

पंचमहाभूतांना घुसळी मरणाची देवता
अिंद्राचें सिंहासन खचलें पाय तिचा लागतां
श्वासांतिल अुष्णता अुसळुनी नंदनवन पेटलें
पदराच्या फटकाऱ्यासरशीं तारांगण भंगलें ३

रणरमणीला अपूर्व असला आवडला सोहळा
निजराणीच्या सत्काराचा थाटमाट मांडिला
बांधुनि चित्रविचित्र कमानी रूंडावळि टांगल्या
सिंचित रुधिरा नरदेहांच्या पायघड्या घातल्या ४

द्रावित लीला नवलाची या झुलती रुद्राकृती
वेताळाची खुले दिवाळी जळती दिवट्या किती
सृष्टि दिसे भेसूर भडकल्या जित्या जिवांच्या चिता
फुटतीं हृदयें पाषाणांचीं करुणनाद अैकितां ५

धगधगती ग्रहगोल डोलतां तोल ढळे भूमिचा
कणाकणांतुनि विजा अुफाळुनि अूर फुटे शांतिचा
अणूंतली धावली भुतावळ चेतवीत नाश हा
अेक भयानक त्याची ज्वाला वेढित विश्वा पहा ! ६

फोफावे ती आग सभोंती कहर कसा माजला
खळखळतां पायांत शृंखळा गुलाम किंचाळला
नाच मंगले ! नेत जीवना दारुण दिव्यांतुनी
चढेल विभवा मानवता ही शापमुक्त होअुनी ८

---

## पिकलें फळ

[ जाति–वधू ]

पिकलें फळ शाखेवर या
ये, चाख पाखरा अतां तया

अुन्हाळ वारा वनांत भरला
शीण तुला तरि फिरुनी आला
आपुलकी तव वाटे मजला
दूर असा मग कां सखया !

हिरवी शोभा रमवी नयना
झेपेना परी भार जीवना
अबोल कां झालास बोलना !
ओढ कशी लागे हृदया

आकारुनि ये अवघी गोडी
अुरली आतां अवधी थोडी
अवघडली ही माया वेडी
जाअिल बघतां क्षण वांया

घे नजराणा नवरंगाचा
बोल अैकवी अेक सुखाचा
खोल बंध हळुवार जिवाचा
गोड करी शेवट राया !

## जिवंत मरण

[ छंद–ओवी ]

मोहवूनी माझ्या मना   जाशी कुठें रे! पाखरा
जगीं मला होता अेक   तुझ्या आशेचा आसरा
सप्तरंगी स्वरांचें त्या   नभीं निमालें विमान
दुभंगल्या हृदयाचें   कसें करूं समाधान!

तुझ्या विरहाच्या तापें   सुके हिरवी ही राअी
स्नेहधारा अंतरतां   आटुनी हा झरा जाअी
अुन्हाळल्या वेलीवरी   करुणेची छटा नाचे
चुकून तें खुले हास्य   अुरीं खचल्या कळीचें

दोन घटकांचा खेळ   लावी चटका जिवाला
पुन्हा प्रीतीच्या फुलांचा   मोहरेल कधीं मळा?
किती वाट पाहूं तरी   दुःख येअीना सांगता
गोड जीवनाचें गीत   कोण अैकवील आतां!

क्षितीजाच्या पलीकडे   विरे दिवसाचें तेज
माजे अवसेची निशा   भिजे आसवांनीं शेज
मालवे ती मंद ज्योती   राहे पणती रिकामी
फुटे अमृताचा पेला   आहे खरी अभागी मी

हीच काय केलीस तूं   माझ्या प्रेमाची परीक्षा?
जिवंत या मरणाची   कशी भोगूं तरी शिक्षा!

---

# सागरांतील बेटें

[ जाति–पतितपावन ]

संसाराचा विशाल सागर पसरे भंवताली
विराट तो विस्तार विलोकुनि विस्मित मति झाली
परिवाराचा अपार पडला विश्वाला वेढा
जललहरींचा चंचल चाळा करी जीव वेडा

स्त्रीपुरुषांचीं त्यांत किती हीं सानथोर बेटें
नकळत त्यांना दिवसारातीं नवल नवें भेटे
कोडें मोठें खरेंच कोठें अैलपैल आहे
अज्ञाताच्या आवरणांतुनि जीवन हें वाहे

नाचत नादें दिपवी नयना स्वप्न अनंताचें
गीत गोड तें अस्फुट घुमतें अनंत हृदयांचें
वेढुनि पाणी अवघ्या द्वीपां ठेवी दूर परी
'अेकच आहों आपण' आंतुनि लागे ओढ खरी

स्निग्ध चांदणें शीतल वारा चमचम ताऱ्यांची
कोकिलकूजन मंजुळ माया अमूर्त मधुरांची

धारुनि बंधन मिळवी त्यांचे दुरावले हात
तशी निराशा हासत लावी कशी गळा तात

अुरांत अुत्कट अुत्कंठा तरि अुफाळून यावी
कुणी दिला आदेश आणि ती विरुनी झणिं जावी

अैकुनिया जणुं गाऱ्हाणें या असंख्य शकलांचें
अेक खंड घडवाया चाले तांडव लाटांचें

## मुकी कळी

[ जाति–दिंडी ]

कळी दिवसाची खुले निळ्या धामीं
लाविलें मी अंगणीं बीज नामी
गात डोले चंडोल अंबरींचा
तसा जागा हो स्वर्ग भूवरीचा

झुले छाया पसरीत सोनजाळें
मनीं आशा नाजूक करी चाळे
कसें साजे किरणांत छान आळें
वेड मजला जणुं लागलें निराळें

घेत मोदें चाहूल मंदचाली
आवडीनें जळ ओंजळिनें घाली
आणि गुणगुणुनी नवीं गोड गाणीं
जगा ऐकविली वेगळी कहाणी

कुणी कुजबुजती, नसे परी चाड
चित्र नवसाचें जपे जिवापाड
न त्या बाधो पाऊस ऊन वारा
तिथें ठेवियला जागता पहारा

वरी अंकुर सुकुमार किती आला
निधी नवलाचा कीं मला मिळाला

राघुमैना नाचती कौतुकानें
हळू लवलवती सान निंबपानें

चैत्रपालविचा रंग भरे रानीं
कोकिलेचा कुहुनाद घुमे कानीं
चारुलतिकेची चंद्रकोर वाढे
तिला मांडवही वागवीत लाडें

मेघ गगनीं रंगतां सांजवेळीं
दूर सारस चालले संथ मेळीं
लाल पिवळ्या चिमुकल्या पल्लवांत
हसे कलिका कशि मजकडे पहात

स्वप्न पडलें निशिं अिंद्रधनुष्याचें
फुले सुंदर अुद्यान जीवनाचें
जीव बागडतां कोण हांक मारी?
अुषा अश्रू अुधळीत अुभी दारीं!

जडे आतुरता दिसे लता चूर
अूर दाटे अन् अुठे करुण सूर
पडे कोमेजुनि गोड कळी खालीं
मुग्ध माया ती मातिला मिळाली

# करूं कसें स्वागत!

[ जाति—श्यामाराणी ]

हासत हळु आलीस जरी
करूं कसें स्वागत सांग तरी!

सुवर्ण सुमनें नभीं अुधळितां
अुषे! खुलविसी लांछित जगता
दिपवी नयना तुझी दिव्यता
भरे परी अंधार घरीं

दावित आशा स्वप्नें सुंदर
सले अंतरीं शल्य निरंतर
नवी रम्यता फुलतां भूवर
लटके लखलख वज्र शिरीं

समतेचा तव साद पसरतां
धरी गळा कशि घोर विषमता
तळमळते प्रिय भारतमाता
होत कधीं वनवास दुरी!

विरे पटल तें वरचें मोहक
दिसे सृष्टिचें रूप भयानक
घेत बळी दुबळ्यांचे नाहक
मिरवे मीपण जयकारीं

कण्हते करुणा झोपडींत या
कवटाळी तिज कराल छाया
मिळे धुळीला अमोल माया
अुगांत फुटली कला खरी

अश्रुजलानें भिजली माला
करतल मधुरे ! रुधिरें भरला
चहुंबाजूला फेंकित ज्वाला
भीषण काली नाच करी

रुते शृंखला पायीं अजुनी
जिणें गुलामी जळे आंतुनी
रमूं कसा मी तुझ्या पूजनीं
घुमे क्रांतिची रणभेरी

---

# वनस्थली

[ सुनीत ]

मोही भान वनस्थली विविध ही शोभा सदा दावितां
खेळे जीवन मोकळें सहज ये आकारुनी दिव्यता
साजे सुंदर होउनी मधुर जें आहे निसर्गांतरीं
जादूगार कुणी करी प्रगट कीं येथें खरी चातुरी

कांहीं मंजुळ बोलती तरुलता, संदेश देती झरे
सूक्तें अैकविती शिला, हितगुजें हुंकारितीं पाखरें
सोनेरीं किरणें रहस्य रमतां छायेंतलें सांगतीं
कोडीं आवडिनें निवांत अुकली प्रीती जिवासंगती

दैवी आकृति रंगवी स्थिरचरां संजीवनी ओतुनी
सृष्टीचा कवि चाखवी स्वरसुधा आनंदुनी आंतुनी
स्वच्छंदें विसरून बंध विलसे स्वातंत्र्य शांतीसवें
रूपांनीं रमणीय अेकवटलीं विश्वांतलीं वैभवें

लीला दावित मुग्ध सुंदर कला आणी नवी देणगी
झालें संकट हें परंतु जगणें या माणसांच्या जगीं

---

## पूजा

मधुर मूर्ति कमलासनिं साजे शांति देवतेची
रुचिर चंद्रिका तिथें अुभी कां छबी दिव्यतेची
रम्य अुपवना अधिकच खुलवी वासंतिक माया
सांजसकाळीं अुधळी ल्हरी सोनेरी छाया

रुमझुमती मधुलतिका घाली मंदानिल रुंजी
फुलराणीच्या मंजुळ गानीं झुलतीं कारंजीं
किलबिलतीं किति गोड पाखरें, सुरेख रंग भरे
मुग्ध जिवा आळवीत विहरे आशा मोदभरें

नंदनवनची सुंदर शोभा दंग करी नयना
येती धरुनी भाव दर्शना लालस नृपललना
काळ बदलता फिरवी द्वाही नूतन राजाची
त्या कुंजाची वाट गमे मग गांठच मरणाची

नवल न वाटे अितरां परि तें, गुणी राजदासी —
करुणा अैकुनि अप्रियवार्ता पडली सायासीं
प्राणाप्रिय ती होती प्रतिमा भाविक युवतीला
खुपे तिच्या कोवळ्या मनाला अन्यायी लीला

चैत्रांतिल नव सौख्याचा दिन वळे पश्चिमेला
रुसतां हसरीं सुमनें तळमळ लागे करुणेला
होवो कांहीं अंतरिंचा परि टळूं नये नेम
क्षणोक्षणीं रमणीचें निर्मळ अचंबळे प्रेम

सुवर्णपात्रीं पूजाद्रव्यें घेउनि ती जातां
नजर रोखुनी झणीं तिजकडे वदे राजमाता
"जीव नकोसा होत तुला कां, सोड खुळा चाळा" !
लक्ष्य न तिकडे देतां चाले पुढें धीट बाला

बावरली तिज बघुनी गहिरी राणी वनमाला
नाजुक बोटांतुनी गुलाबी गळे पुष्पमाला
बोले रागें "काय तरी हें आठवलें तुजला ?
जा ! काळें कर तुझी सावली घातक होत मला"

सायंकिरणीं कशी रंगली नृपकन्या कमला
प्रणयाचें सुखस्वप्न पाहतां जीव तिचा रमला
येतां करुणा तशी समोरुनि तिजला कंप सुटे
ओठावरचें अस्फुट गाणें नकळे जाय कुठें

"सावधान व्हा ! साधाया शुभघटी पूजनाची"
पुन्हा पुकारी नरनारींना वाणी धीराची

घेती कोणी ओढुनि दारें, कुणी तिला टाळी
अुंच गोपुरां चढे दिसाची शेवटची लाली

धूमिल छाया चहुंबाजूंनीं कुजबुजतां जमल्या
ओसरली रहदारी, खेळुनि रानकळ्या शिणल्या
दूर देवळांतुनी निवाले आरतीचे सूर
अबोल भीतीनें धरणीचें झालें मन चूर

लकेर छेडी आर्त कोकिळा, तारा हुरहुरती
संथ निळ्या डोलतां सरोवरिं कुमुदें थरथरतीं
अुठे जसा बागेच्या हृदयीं ठसा प्रकाशाचा
डोळ्यांवर विश्वास बसेना राजरक्षकांचा

गाहिंवरुनी रमणी निरखी तें प्रतीक आवडतें
त्यासरशीं ते परजुनि शस्त्रें घेती धाव तिथें
कडाडले यमदूत "कोण तूं, आलिस कां बोल" ?
"मी तर आहे दीन पुजारिण," अुमटे मधुबोल

करुणेचा तो अूर दुभंगे, घुमे साद अेक
धवल मूर्तिला लाल जलाचा घडला अभिषेक
मालवत्या ज्योतीचें तिमिरीं मंदस्मित मावे
वेंचित शांति फुलांचें अश्रू स्फुंदत रात्रिसवें

# तळमळणारें मन

कुणीतरी हा बोल ऐकवा प्रेमळ आऔीला
धीर जरा द्या पंकीं रुतल्या व्याकुळ गाऔीला

ठसे दीन ती मूर्ति अंतरीं वाढे हुरहूर
करुण सूर घुमवीत फिरे मी कुठें तरी दूर

घातक आशा परवशतेची सोबत नरकाची
लागुनि चटका करपे कलिका कोमल हृदयाची

पिंजऱ्यांतुनी पक्षी सुटला रंग नवा गमला
घेत भरारी खुल्या दिलानें निळ्या नभीं रमला

सुंदर कसलें स्वप्न हरपलें, शल्य उरीं हालें
अमर परी तें स्वातंत्र्याचें तेज वरी आलें

लिहील काळहि दिव्य कथा ही सुवर्णाक्षरांनीं
मानवतेची मंगल गाणीं गाऔिल कविवाणी

सुकवी कणकण जरी निराशा शोक नसो आऔी !
होऔिल तारक संकटकालीं तुझीच पुण्याऔी

म्हणती कोणी कीं नवलाचा चंद्र झणीं ढळला
नव्या पिढीच्या बलिदानाचा अर्थ न त्यां कळला

देत जगाला क्रांती अुजळा पाजळुनी ज्योती
जागे जीवन झेलाया तव नयनांतिल मोती

दारुण या वनवासीं जीवा अेक जडे छंद
प्रणाम माझा मायभूमिला, बोला जयहिंद!

---

[ जाति-चांदरात ]

कसा कळेना तुला बोल हा, नवलच वाटे मला
तुजवरी जीव तरी लोभला

नवमोहन पसरी वसंतवायू वनीं
दंगली कोकिळा पुन्हां गोड गायनीं
मी वाट बघे तव आतुरल्या लोचनीं

सभोंवती हळु संध्येची या पिवळी माया फुले
सावळी काया गिरिची खुले

मावळत्या दिवसाची ममता कशी मोहवी घना
क्षणभरी मौज गमे ती मना

स्वर आले मंजुळ हिरव्या राईंतले
तूं येशिल सखया! म्हणुनी आसावलें
घेत तुझी चाहुल नीरांजन लाविलें

गवाक्षांतुनी क्षितिजाच्या ही हसतां नव बालिका
कोठुनी अस्फुट ये हुंदका!

काय सले रजनीच्या हृदयीं, चंद्रकोर बावरे
शांतिला सुटे तसें कांपरें

थांबलीं वाजतां मंद तुझीं पाउलें
चांदणें प्रीतिच्या नयनांतिल लोपलें
तबकांत फुलांचे अश्रू ओसंडले

करूं कुणाचें पूजन आतां, कळे न चुकलें कुठें
कधी हें कोडें माझें—सुटे !

---

भूरमणीला रमवित मोदें नवगंगा वाहे
आद्यकवींच्या विमल मानसीं जन्म जिला लाहे
रात्रंदिन त्या नवरसरंजित झुळझुळती लाटा
झाल्या जगतीं मधुभावा ज्या रम्य राजवाटा १

वितरी तीरा अविरत शोभा राजस तरुराजि
विहंगवाणी मंजुळ गाणीं नित गाया राजी
अुषा लाजरी भंवती पसरी नवतीची माया
सखीसवें विहरे ऋतुराया, झुले छान छाया २

छेडित वीणा नित्य सुखाची भाविकता साजे
शृंगाराचा सुरंग बघतां सुरलोकहि लाजे
सांगत जीवा गोड गुपीतें विलसे रसराणी
स्वप्न फुलांचा सुगंध नाचत मंदानिल आणी ३

शांत परिसरा खुलवी जादू मधुर चांदण्याची
गहिरी रजनी प्रगट करी कशि नगरी नवलाची

अुपवनिं सुंदर प्रतिभामंदिर दिपवी नयनाला
रुणझुण चरणीं रूपखनी ती रंगत गीतकला ४

अुजळी जीवन ज्योत चिरंतन जागत अेकांतीं
सौंदर्याला स्वानंदाची सोबत दे शांति

प्रेमदेव हृदयांतुनि घुमवी समतेचा पावा
छंद साधितां अधीर रसिका! बंध तुझा जावा

---

## शेवटचें फूल

[ जाति–नववधू.

घे हळू फूल हें शेवटलें
फुलबाग करपतां जें फुललें

दैवत माझें तुला मानिलें
आवडिनें तव कोड पुरविलें
मधुमय वचनीं नित्य वानिलें
तुजसाठीं खपतां सुख झालें

गात वसंता गेला कोकिळ
झुळझुळ लहरी पसरी परिमळ
नकळत निवतां आंतिल तळमळ
तें गुपीत पहिलें आठवलें

घाव झेलुनी शिणली काया
वेध लागला घरास जाया
मोही परि ही मोहन छाया
आतूर जिवाचा सूर जुळे

चढली लाली निळया नभाला
स्वप्न दिसाचें दिसे निशेला
मोहक हा क्षण अेकच आला
प्रकाशांत अंधुक वाट खुले

## घे आतां अवतार !

[ जाति–गोविंद ]

घे आतां अवतार, देवा !
आळवुनी तुज शिणली वाणी, अंत किती बघणार ?

सखा तुझ्याविण नाहीं कोणी
स्फुंदत आशा केविलवाणी
तव करुणेच्या नव लहरींनीं उजळी हा अंधार

घुमवित मंजुळ मुरलीगीता
गोकुळांत या ये भगवंता !
संजीवन दे दीन जिवांना वर्षुनि अमृतधार

परवशतेचा पाश निवारुन
शांतिसुखानें फुलवी जीवन
अेकमुखानें मानवतेचा विश्व करो जयकार !

REFBK-0006781

REFBK-0006781

# [ शुद्धिपत्र ]

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३२ | ९ | देउुळ | देऊळ |
| ३४ | १ | करी | करि |
| ३८ | १२ | सभोंवर | सभोंवार |
| ६० | ४ | दिन | दीन |
| ७३ | १२ | वाटे | वाट |
| ,, | १४ | करुणा | '**करुणा**' (दासीचें नांव) |
| ७९ | १९ | तो | तों |

सूचना—पान ४१ वरील 'शांतीचा प्रतिध्वनि' या कवितेतील शेवटच्या ओळी ऐवजीं—

**'भाग्याची सुचवी पहाट परि हा तारा नव्या कांतिचा'**

ही ओळ वाचावी!